## प्रकरण तिसरे

## राष्ट्रीय पातळीवरील व महाराष्ट्रातील

## रिपब्लिकन पक्षाची कार्ये

## प्रकरण तिसरे

## राष्ट्रीय पातळीवरील व महाराष्ट्रातील रिपब्लिकन पक्षाचे स्वरूप व कार्य

३ आक्टोबर, १९५७ रोजी अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाली व रिपब्लिकन पक्षाच्या मध्यवर्ती कार्यकारी मंडळामध्ये, रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष म्हणून मद्रासमधील एन्. शिवराज यांची निवड झाली तर उपाध्यक्ष म्हणून बाबू हरदास आवळे यांची निवड झाली. तर पक्षाचे जनरल सेक्रेटरी म्हणून बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांची निवड करण्यात आली.

रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाल्यानंतर ३.१०.५७ ते १४.५.१९५९ पर्यंत हा रिपब्लिकन पक्ष एकसंघ होता. या काळामध्ये या पक्षाने पुढील प्रकारची कार्ये केली.

### १) लोकसभा व विविध प्रांतातील विधान सभेतील प्रतिनिधी :

६ डिसेंबर, १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मृत्यू झाला. त्यांनी मृत्यूच्या अगोदर शेडयूल्ड कास्ट फेडरेशन हा पक्ष बरखास्त करून "रिपब्लिकन पक्ष" स्थापनेचा विचार केला होता. परंतु त्यांच्या मृत्यूमुळे व १९५७ रोजी लगेच देशातील दुसऱ्या सार्वत्रिक निवडणूका जाहीर झाल्या होत्या. त्यामुळे शेडयूल्ड कास्ट फेडरेशन मधील नेत्यांनी हा पक्ष विसर्जित न करता या पक्षाच्या नावानेच निवडणूका घ्यायच्या ठरवल्या. या निवडणूकीत शेडयूल्ड कास्ट फेडरेशन तर्फे लोकसभेत अनुक्रमे

"दादासाहेब क गायकवाड, बी.सी. कांबळे, मा. एस्.के. डिगे, जी.के. माने, हरिहरराव सोनुले, दत्ता कट्टी, एन्. शिवराज, के.मु. परमार व बी.डी. साळुंखे हे उमेदवार लोकसभेत विजयी झाले." ३ आक्टोबर, १९५७ रोजी रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाल्यानंतर हे सर्व विजयी उमेदवार रिपब्लिकन पक्षात सामील झाले. या दुसऱ्या सार्वत्रिक निवडणूकीत लोकसभेच्या एकूण ४९४ जागांपैकी कॉंग्रेसला ३७१ जागा मिळून तो प्रचंड बहुमताने विजयी झाला होता. तर इतर सर्व विरोधी पक्ष व इतर यांना १२३ जागा प्राप्त झाल्या होत्या. शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनला ९ जागा प्राप्त झाल्या, त्यापैकी ७ जागा मुंबई राज्यातून, मद्रासमधून १, म्हैसूरमधून १ अशा. १९५७ च्या निवडणूकीत शे.का.प. ला ९ जागा प्राप्त झाल्या व रिपब्लिकन पक्ष त्यामुळे लोकसभेत प्रभावी विरोधी पक्ष बनला.[१]

२) <u>रिपब्लिकन पक्षाचे पहिले अध्यक्ष :</u>

रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष होण्याचा पहिला मान एन्.शिवराज यांना मिळाला व त्यांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन पक्षाच्या कार्याला सुरुवात झाली.

३) <u>रिपब्लिकन पक्षाची संसदेमधील कार्ये :</u>

१९५७ साली मद्रास प्रांतातून लोकसभेवर एन्. शिवराज यांची निवड झाली होती. ते आंबेडकरांचे जेष्ठ अनुयायी व सहकारी होते. त्यामुळे "दादासाहेब गायकवाड यांनी लोकसभेतील पक्ष नेतेपदाचा राजीनामा देऊन एन्. शिवराज यांना आग्रहपूर्वक पक्ष नेतेपद दिले." [२] त्यामुळे त्यांनी हे पद स्वीकारून लोकसभेत पुढील भूमिका मांडल्या.

अ) "मार्च १९५७ च्या अंदाजपत्रकीय अधिवेशनात ते म्हणाले की, भारतातील दलित पिडीत जनतेस विकास कार्याचे फायदे प्रथम मिळू द्या. जोपर्यंत सरकार, भांडवलदार व कामगार एकत्र येऊन सांघिकरित्या कार्यप्रवण होत नाहीत तोपर्यंत त्या योजना ज्या प्रमाणात यशस्वी व्हायला पाहिजेत त्या प्रमाणात यशस्वी होणार नाहीत." [३]

ब) २६.११.१९५९ रोजी लोकसभेत भाषण करत असतांना त्यांनी असे उद्गार काढले की, "आपला पक्ष सरकारशी व इतर बाबतीत मतभेद असले तरी, आक्रमणाच्या समस्येबाबत भारत सरकारने घेतलेल्या कोणत्याही निर्णयास सरकारला मदत करील व आक्रमण साहयाबाबत भारत सरकारने आम्हास मदत मागितल्यास आम्ही आमच्या निढळाचा घाम व देश-हितासाठी प्राणांचेही बलिदान करू." [४]

देशातील दलित कामगार व गरीब लोकांच्याबद्दल एन्. शिवराज यांना आस्था होती. त्यामुळे लोकसभेत आपले प्रतिनिधित्व करीत असतांना त्यांच्या विकासासाठी वरील विचार व्यक्त केले. याशिवाय भारत-चीन आक्रमणाच्या वेळी त्यांनी लोकसभेत पक्षभेद विसरून देशाच्या सार्वभौमत्वासाठी मदत करण्याचे व प्रसंगी प्राणाचे बलिदान करण्याचे आश्वासन दिले.

क) "खासदार बी.सी. कांबळे यांनी ९ डिसेंबर, १९५७ ला लोकसभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मृत्यूच्या संदर्भात जी चौकशी करण्यात आली होती, त्या चौकशीचा अहवाल सभागृहात सादर करण्याची मागणी केली होती. परंतु तात्कालीन गृहमंत्री गोविंद वल्लभ पंत यांनी अहवालाचा थोडाच भाग सादर केला. त्यामुळे रिपब्लिकन पक्षाच्या सर्व सभासदांनी सभात्याग केला." [५]

ड) "शेडयूल्ड कास्टना मिळणाऱ्या राजकीय सवलतीव्यतिरिक्त अन्य सर्व सवलती नवबौधांना देण्यात याव्यात असा महत्त्वपूर्ण ठराव बी.सी. कांबळे यांनी लोकसभेत ९ डिसेंबर, १९५९ रोजी मांडला होता."[६]

वरील प्रकारचे विचार व ठराव रिपब्लिकन पक्षाचे खासदार बी.सी. कांबळे यांनी मांडून सरकारच्या पक्षपाती धोरणाला विरोध केला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मृत्यू संशयास्पद वाटल्याने व त्यावरील सरकारचे अस्पष्ट अहवाल वाचन झाल्याने त्यांच्यासह सर्व रिपब्लिकन खासदारांनी सभात्याग केला होता. त्याशिवाय नवबौद्धांना राजकीय सवलती व्यतिरिक्त सरकारी नोकरीत राखीव जागा वगैरे सवलती मिळाव्यात म्हणून लोकसभेत त्यांनी आपली कैफियत मांडली होती व त्यासंबंधी युक्तिवाद केला होता.

१) लोकसभेतील खासदार दत्ता कट्टी यांनी १५ फेब्रुवारी, १९५८ रोजी लोकसभेत पुढील विचार मांडले. "अस्पृश्यता पाळणे हा जरी गुन्हा असला तरी ती अत्यंत तीव्र प्रमाणात पाळली जात आहे. या गुन्हयासाठी कुठे कुणाला शिक्षा झालेली आहे अशा प्रकारचे उदाहरण घडले आहे, असे काही माझ्या ऐकीवात नाही. अमेरिकेत काही लाख निग्रो गुलामांची मुक्तता करण्यासाठी भयंकर असे यादवी युध्द झाले. हजारो लोकांनी आपला देह धारातीर्थ ठेवला. परंतु आपल्या या देशात ज्या लोकांना गुलामगिरीने अत्यंत निकृष्ट अवस्थेत टाकले त्या सहा कोटी लोकांच्या उद्धारासाठी एकही युध्द झालेले नाही. अस्पृश्यता जरी राष्ट्रीय प्रतिष्ठेस बाधक असली तरी अथवा ती माणूसकी वरील कलंक असला तरी, असे असतांनासुध्दा या देशात ती नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले जात नाहीत."[७]

त्यांच्या या वरील व्यक्तव्यावरून खासदार कट्टी यांना अस्पृश्यते-

विषयी किती आस्था होती हे समजते व रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमाने तिचे स्वरुप लोकसभेत त्यांनी मांडलेले दिसते.

२) खासदार दादासाहेब गायकवाड यांनी १९ मार्च, १९५९ रोजी लोकसभेत पुढील प्रमाणे भाषण केले. "दिवसेंदिवस भारतीय अस्पृश्यांचा प्रश्न न सुटता तो अधिकच चिघळत आहे." त्यांनी आपल्या भाषणात जेथे जेथे अत्याचार झालेले होते. त्याचा उल्लेख करुन पोलीस व अधिकारी यांचे वर्तन कसे पक्षपाती आहे हे सांगितले. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, "अस्पृश्यतेचे उच्चाटन करुन या वर्गाची परिस्थिती सुधारायची असेल तर अस्पृश्यांना सर्वच हिंदूंच्या दास्यातून मुक्त केले पाहिजे. त्यांच्यासाठी स्वतंत्र वसाहती स्थापून स्वतंत्र खोल्यात त्यांना सुखाने जगू द्या. जेथे जेथे ते शेतीचा व्यवसाय स्वतंत्रपणे करतील व जेथे ते कुणाचेही गुलाम होणार नाहीत अशा ठिकाणी त्यांच्या स्वतंत्र वसाहती स्थापन करा." खेडयातील दुरावस्था सांगतांना ते म्हणाले की, "खेडोपाडी अस्पृश्यांची अवस्था गुलामापेक्षाही हीन आहे. दक्षिण अफ्रिकेतील निग्रोपेक्षाही वाईट वागवले जाते. हे पहावे म्हणजे त्यांना खरी परिस्थिती कळेल." यावर उपाय सांगतांना ते म्हणाले "अस्पृश्य, आदिवासी व इतर मागासलेला वर्ग यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी निर्वासितांना ज्या व्यापार उद्योगात सवलती दिल्या जातात, त्या यांनाही द्याव्यात तसेच रेल्वे स्टेशनवर पाणी वाटण्याचे काम मेहतरांना द्यावे आणि स्टेशनमधील चहा-उपाहारगृहाचे परवाने अस्पृश्यांना द्यावेत व तसेच प्रत्येक खात्यात योग्य प्रमाणात अस्पृश्य लोक घ्यावेत." ८

~~(संदर्भ - आर.के. क्षिरसागर, भारतीय रिपब्लिकन पक्ष, नाथ प्रकाशन, औरंगाबाद, १९७९, पृ.क्र. ५९ किंवा पृ.क्र. ६०)~~

दादासाहेब गायकवाड यांच्या वरील भाषणामध्ये अस्पृश्यतेविषयीचा दृष्टिकोन समजतो.

३) खासदार के.यु. परमार लोकसभेत दि. २५ एप्रिल, १९५९ ला "शेड्यूल्ड कास्ट व शेड्यूल्ड ट्राईब्ज यांच्या रिपोर्टवर बोलतांना म्हणाले की, "या देशात अस्पृश्यांचा प्रश्न सोडविण्याचे बाबत राज्य सरकार व भारतीय सरकार अयशस्वी झाले आहे. मी म्हणतो सवर्ण हिंदूनी आमची आर्थिक, सामाजिक, पिळवणूक केली, पण आर्थिक व सामाजिक पिळवणूकीपेक्षाही अधिक वाईट, म्हणजे राजकीय पिळवणूक आहे." "सरकार एका बाजूने म्हणते नोकरांचे राखीव प्रमाण भरले पाहिजे. परंतु दुसऱ्या बाजूने सरकार याबाबतीत लक्ष घालीत नाही. आमच्या समाजापैकी अजून एकही परराष्ट्रीय वकील किंवा गव्हर्नर दिसत नाही. तसेच नोकरीच्या क्लास १ तसेच क्लास २ मध्ये नोकरांचे प्रमाण फारच कमी आहे." [९]

रिपब्लिकन पक्षाचे खासदार के.यु. परमार यांनीही लोकसभेत आपला आवाज उठवून नोकरभरती विषयीची वस्तुस्थिती व सरकारचा पक्षपातीपणा लोकसभेच्या लक्षात आणून दिला.

३) खासदार जी.के. माने, मार्च १९५८ च्या रेल्वेच्या अंदाजपत्रकावर बोलतांना म्हणाले की, "मुंबई राज्यातील कोकणचा प्रदेश अत्यंत उपेक्षित आहे. रेल्वेच्या या अर्थ संकल्पामध्ये त्यांची उपेक्षा करण्यात आली आहे. कोकण रेल्वेचे काम ताबडतोब हाती घ्यावे अशी जोरदार मागणी त्यांनी केली." १०

कोकण रेल्वेच्या प्रश्नासंबंधी के.यु. परमार यांनी लोकसभेत आवाज उठवून त्याचे कार्य हाती यावे यासाठी आपले विचार व्यक्त केलेले दिसतात.

बॅ. राजाभाऊ खोब्रागडे हे राज्यसभेचे प्रतिनिधी होते. त्यांनी राज्यसभेतही दलितांच्याविषयी अनेक समस्या मांडलेल्या दिसतात. शेतकऱ्यांच्या

मालाला योग्य मोबदला मिळाला पाहिजे. शेतक-यांना बी-बियाने व खते सरकारनी पुरविले पाहिजेत असे त्यांनी प्रतिपादन राज्यसभेत केले होते. त्यांनी राज्यसभेत पंचायत बिलालाही विरोध केला. लँड बिलाचे त्यांनी स्वागत केलेले आहे. देशाच्या पंचवार्षिक योजनेवरही त्यांनी राज्यसभेत भाष्य केलेले आहे. ग्रामपंचायत बिलावर बोलतांना ते म्हणाले की, "ग्रामपंचायत ही आधुनिक मनुचे राज्य होईल." [११]

रिपब्लिकन पक्षाच्या प्रतिनिधींनी कायदेमंडळामध्ये वरील वेगवेगळे विचार व्यक्त केले आहेत.

१९५७ च्या दुस-या सार्वत्रिक निवडणूकीत भारतातून लोकसभेवर ९ प्रतिनिधी निवडून गेले होते. एन्. शिवराज यांच्या नेतृत्वाखाली या पक्षाने समर्थ विरोधाची भूमिका पार पाडली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारानी भारावलेले हे प्रतिनिधी असल्याने त्यांनी या पक्षाद्वारे लोकसभेत व राज्यसभेत आपला विरोध वेळोवेळी प्रकट केला. आणि दलित, मजूर, आदिवासी गरीब, कोकण यांच्या हितासाठी त्यांनी अभ्यासपूर्वक प्रश्न विचारून सरकारला धारेवर धरले होते. त्यामुळे कधी नव्हे तेवढे या पक्षाला अभूतपूर्व महत्त्व प्राप्त झाले होते. या पक्षाने संसदेतील या कार्याशिवाय आणखी काही कार्ये केलेली दिसतात ती पुढीलप्रमाणे -

१) <u>समता सैनिक दलाचे पुनरूज्जीवन</u> (पुनर्स्थापना) :

इ.स. १९२८ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समता सैनिक दलाची स्थापना केली होती. ही एक दलितांच्यासाठी कार्य करणारी "स्वयंसेवी संघटना" होती. या संघटनेने डॉ. आंबेडकरांच्या भाषणाच्यावेळी व दौ-यावेळी कार्य केले होते. त्यांचा स्वतंत्र असा गणवेश होता. सभेत

शांतता राखणे, शिस्त निर्माण करणे, संचलन करणे इत्यादी कार्ये या समता सैनिक दलातर्फे करण्यात येत होती. डॉ. आंबेडकरांच्या मिरवणुकीच्या-वेळी, शिस्त सांभाळणे व संचलन करणे हे कार्य या संघटनेने केले होते. म्हणून रिपब्लिकन पक्षाने या संघटनेचे पुनरूज्जीवन करण्याचे ठरविले. रिपब्लिकन पक्षाच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय समता सैनिक दलाचे नागपूरला एक अधिवेशन ऑक्टोबर, १९५७ ला भरवण्यात आले. त्याचे उद्घाटन भैय्या-साहेब आंबेडकर यांनी केले. या बैठकीला एन्. शिवराज, बाबू हरदास आवळे, राजाभाउ खोब्रागडे बी.सी. कांबळे, आर.डी. भंडारे, खासदार दादासाहेब गायकवाड, जी.के. माने, खासदार दत्ता कट्टी, दा.ता. रूपवते, घनश्याम तळवटकर आणि मान्यवर नेते उपस्थित होते. यावेळी समता सैनिक दलाची कार्यकारिणी निवडण्यात आली. त्यात कार्यकारणीचे खालील सदस्य होते.

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | - | श्री हरदास आवळे (विदर्भ) |
| उपाध्यक्ष | - | श्री जी.के. माने (मुंबई) |
| सेक्रेटरी | - | श्री आर.आर. पाटील |
| सेक्रेटरी | - | श्री एम्.एम्. ससाळेकर (मुंबई) |

ही कार्यकारिणी निवडल्यानंतर हरदास आवळे म्हणाले की, "यापुढे दलाची संघटन शक्ती, घटना दुरूस्ती व गणवेश यांच्याकडे कटाक्षाने लक्ष पुरवून ही लढाबू संघटना पक्षाला व बौध्द धर्माला अधिक जोमाने कसे सहाय्य करील याबद्दल आम्ही आवश्यक प्रयत्न करू." [१२]

रिपब्लिकन पक्षाच्या वाढीसाठी व शिस्तीसाठी या पक्षाने ही राजकारण विरहित संघटना उभी केली.

२) भूमिहिनांच्या सत्याग्रहाची चळवळ :

१९५१ साली लोकसभेत घटना दुरुस्तीवर भाषण करत असतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मंत्रिमंडळात असतांना राज्यकर्त्यांनाच सवाल केला होता की, "तुमचे धोरण असेल त्याची जमीन आहे पण माझा सवाल असा आहे की, नसेल त्याचे काय ?" याचे उत्तर भारताचे पंतप्रधान देखील देऊ शकले नाहीत. बाबासाहेब आंबेडकरांच्या ह्या अंतिम प्रश्नाला धसास लावण्यासाठी शेवटी अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाला २९ जुलै, १९५९ पासून सत्याग्रह सुरू करावा लागला व सरकारला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विचारलेल्या "नसेल त्याचे काय ?" या प्रश्नाला उत्तर धावेव लागणार की, नसेल त्याला हिंदुस्थानात जेवढया काही सरकारी, आकारी, बिन आकारी पडीक, जंगलाच्या नावाखाली पडिक अशा सर्व जमिनी विहीताला देणे हाच पर्याय जालीम उपाय म्हणून वापरावा लागेल. आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची ही अंतिम इच्छा थोडया का अंशाने होईना आज पुरी करण्याचा विडा रिपब्लिकन पक्षाने उचललेली आहे." [१३]

त्यामुळे हा सत्याग्रह यशस्वी करण्यासाठी संपूर्ण भारतातून व महाराष्ट्रातून निरनिराळे सत्याग्रह करण्यात आले. दादासाहेब गायकवाड, एन्. शिवराज, राजाभाऊ खोब्रागडे इ. नामवंत व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली हा सत्याग्रहाचा लढा रिपब्लिकन पक्षातर्फे उभा करून भूमिहिनांना पडिक जमीनी मिळवून देण्याचा प्रयत्न केला. या सत्याग्रहात अनेक लोकांना अटक करण्यात आली होती. या सत्याग्रहाने महाराष्ट्रातील तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण व पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना निवेदने सादर केली होती.

३) स्त्रियांची संघटना :

दि. ६.५.१९४५ रोजी अखिल भारतीय दलित वर्ग महिला फेडरेशनची स्थापना करण्यात आली होती. सौ. मिनांबल शिवराज हया अध्यक्षा होत्या. सरोजनी डी. जाधव या स्वागत अध्यक्षा होत्या. तर शांताबाई वडवळकर या सरचिटणीस झालेल्या होत्या. तर याच धर्तीवर (पद्धतीवर) रिपब्लिकन पक्षाने देखील महिलांची संघटना बांधण्याचा प्रयत्न केला होता. २ ऑक्टोबर १९५७ ला नागपूर येथे अखिल भारतीय महिला परिषद भरविण्यात आली. अध्यक्षास्थानी प्रसिध्द महिला कार्यकर्त्या श्रीमती शांताबाई दाणी होत्या. परिषदेत बालासिंह (कलकत्ता), मुकुंदराव आंबेडकर (मुंबई), भाऊसाहेब मोरे (औरंगाबाद) यांनी मार्गदर्शन केले.[१४]

अशा तऱ्हेने रिपब्लिकन पक्षाने महिला आघाडी स्थापन केली.

४) विद्यार्थी परिषद :

अखिल भारतीय दलितवर्ग विद्यार्थी परिषदेचे १ले अधिवेशन संयुक्त प्रांताचे दलित नेते, खासदार प्यारेलाल कुरील तळीब यांच्या अध्यक्षातेखाली ५ व ६ मे, १९४५ रोजी भरलेले होते. त्याच धर्तीवर रिपब्लिकन पक्षाने अखिल भारतीय रिपब्लिकन विद्यार्थी फेडरेशन नावाची विद्यार्थ्यांची संघटना स्थापन केली होती. या संघटनेचे जनरल सेक्रेटरी म्हणून श्री बी.डी. कांबळे यांनी काम पाहिलेले होते.

५) धर्मप्रसाराचे कार्य :

१९५४ साली बाबासाहेबांनी "भारतीय बौध्द सभा" ही संस्था स्थापन केली व तिच्या मार्फत धार्मिक कार्य करावे, व धर्म प्रसार करावा असे ठरले होते. १९५७ साली या सभेच्या बैठकीत भैय्यासाहेब आंबेडकर यांना या संस्थेचे अध्यक्षपद

देण्यात आले. त्यांच्यामार्फत बौध्द धम्म दिक्षेचे कार्य ठिकठिकाणी सुरु झाले. धर्मांतरामुळे पूर्व अस्पृश्यांच्या सरकारी सवलती बंद झाल्या होत्या. परंतु महाराष्ट्र सरकारशी भांडून त्यांच्या संस्थेने परत मिळविल्या.[१५] मुंबईला दा.ना. रुपवते यांच्या हस्ते काही वाघ्या मुरळी व देवदासींना बौध्द धर्माची दिक्षा देण्यात आली होती. हे महत्त्वाचे धम्म प्रसाराचे कार्य रिपब्लिकन पक्षाने सुरु केले होते.

६) कामगार संघटना :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मजूरांचा विशेष अभ्यास होता. ते भारत सरकारात "मजूर मंत्री" म्हणून काम पहात होते. त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाचीही स्थापना केली होती. व या पक्षातर्फे मजूरासाठी आदर्श असा जाहिरनामाही प्रसिध्द केला होता. म्हणून नव्याने तयार झालेल्या रिपब्लिकन पक्षानेही कामगार संघटना बांधण्याचा प्रयत्न केला. या पक्षाच्या वतीने नागपूरला २ आक्टोबर, १९५७ ला कनिष्ठ गावकामगार व अखिल भारतीय कामगार परिषद भरली होती. या परिषदेचे उद्घाटन खासदार दत्ता कट्टी यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी दादासाहेब गायकवाड होते. या सभेत एन्.एन्. कुंभार, व्ही.टी. परमार, पी.टी. बोराळे व रुपवते यांनी मार्गदर्शन केले होते. यावेळी कामगारांच्यासाठी अनेक ठरावही करण्यात आले.[१६]

कामगार वर्गांना किमान वेतन मिळावे, त्यांना सोयी सवलती मिळाव्यात यासाठी सुरुवातीच्या काळात रिपब्लिकन पक्षाने कामगाराच्या संघटना उभारण्याचा प्रयत्न केला. या संघटनेला एन्. शिवराज यांचेही मार्गदर्शन मिळाले होते.

७) इतर कार्ये :

रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाल्यानंतर कार्यकर्त्यात एक चांगल्या प्रकारचा उत्साह निर्माण झाला होता. लोकसभेच्या व विधान सभांच्या निवडणूकीत १९५७ साली या पक्षाला चांगले यश मिळाले होते. त्यामुळे या पक्षाने "दलित साहित्य संघ", "प्रबुध्द भारत" वर्तमान पत्र चालू केले होते. याशिवाय रिपब्लिकन पक्षाच्या नेत्यांनी आपला पक्ष वाढीस लावला होता. याशिवाय आपल्या पक्षाच्या शाखा भारतात संपूर्ण ठिकाणी बांधण्याचा प्रयत्न सुरु केला होता व याच कालावधीमध्ये पक्षाचे कार्य व लोकप्रियता वाढत चाललेली होती. त्यामुळे दलितव आदिवासी लोकात एकप्रिकारचा उत्साह निर्माण झाला होता.

लोकसभा व विधानसभांच्या सभागृहात रिपब्लिकन पक्षांचे उमेदवार निरनिराळे अभ्यासपूर्ण प्रश्न मांडून, दलितांच्या समस्या, अडचणी सरकारपुढे प्रभावीपणे मांडण्याचे कार्य करत होते. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असणारा रिपब्लिकन पक्ष उदयाला येणार अशी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे देशातील दलित लोकसुध्दा या पक्षाकडे आकर्षित होऊन अपेक्षेने पाहू लागले होते. डॉ. आंबेडकरांच्या चळवळीत कार्य केलेले श्रेष्ठ नेते उदा. एन्. शिवराज, दादासाहेब गायकवाड, राजाभाऊ, खोब्रागडे यांनी पक्षाची धुरा स्वत:च्या खांद्यावर घेऊन समर्थपणे व सुसंघटित-पणे पक्ष वाढीस लावला होता. मोर्चा, सत्याग्रह, निदर्शने, सभात्याग इत्यादी सनदशीर मार्गाने आपले प्रश्न सोडविण्यासाठी दलित लोक या पक्षाकडे येत होते, व आपले प्रश्न सोडवत होते.

परंतु दुर्दैवाने ही परिस्थिती फार काळ टिकू शकली नाही. अवघ्या दोन वर्षाच्या काळातच या पक्षाच्या फुटीस सुरुवात झाली आणि नेतृत्ववाद व विविध कारणांच्यामुळे या पक्षाला नंतरच्या काळात अनेक गट पडून या

पक्षाचे सामर्थ्य व महत्त्व कमी होऊ लागले. हा पक्ष दुभंगल्यामुळे व पक्षाच्या निष्क्रियतेमुळे हा पक्ष नंतरच्या काळात एकसंघ राहू शकला नाही. या पक्षाचे अनेक गट निर्माण होऊन त्यांच्या ऐक्याचे सुध्दा प्रयत्न झालेले दिसतात. परंतु नंतरच्या काळात हा पक्ष एकसंघ होऊ शकला नाही.

रिपब्लिकन पक्ष गट निर्मितीची कारणे व ऐक्याचे प्रयत्न :

दि. ३.१०.१९५७ मध्ये रिपब्लिकन पक्षाची निर्मिती झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मृत्यूनंतर भारतीय पातळीवर दलितांचे नेतृत्व करणारा सर्वमान्य असा नेता अस्तित्वात नव्हता. त्यामुळे डॉ. बाबासाहेबांच्या मृत्यूनंतर सामुदाईक नेतृत्वाची (प्रेसेडियम) ची कल्पना पुढे आली व १.१.५७ रोजी अहमदनगर येथे झालेल्या बैठकीत निरनिराळे ठराव करण्यात आले व सामूहिक अध्यक्षीय मंडळ स्थापन करण्यात आले होते. परंतु ते थोडयाच कालावधीत नेतृत्वाच्या संघर्षामुळे बरखास्त झाले. त्यानंतर रितसर पक्षाची स्थापना झाल्यानंतर अवघ्या दोनच वर्षात या पक्षात फूट पडली व तेव्हापासून फुटीची प्रक्रिया सुरु झाली.

"रिपब्लिकन पक्षाची घटना तयार करण्याबाबत झालेल्या मतभेदा-वरुन जुन्या व नव्या पुढा-यातील अंतर वाढत गेले. ३ ऑक्टोबर, १९५८ च्या आत पक्षाची घटना तयार करुन त्याप्रमाणे पदाधिका-यांच्या निवडणूका घेण्यात याव्यात, असे प्रेसेडियमच्या बैठकीत ठरवण्यात आले होते. पण ठरलेल्या मुदतीच्या आत घटना तयार करण्याची पुरेशी काळजी घेण्यात आली नाही. तेव्हा ३ ऑक्टोबर नंतर जुना पक्ष आपोआप बरखास्त झाला अशी विरोधी मंडळीनी भूमिका घेतली. नागपूर येथे १४ मे, १९५९ रोजी त्यांनी आपली वेगळी परिषद घेतली आणि श्री आवळे, श्री बी.सी.कांबळे व दा.ता.रुपवते यांच्या नेतृत्वाखाली "दुरुस्त" रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाली."[१७]

दलित समाजासाठी कार्य करणारा तो मोठा नेता की मी यावरून पक्षामध्ये स्थापनेपासूनच मतभेद सुरू होते. या पक्षात असणारे तरूण नेते बी.सी. कांबळे, रूपवते, हरिदास आवळे ही सुशिक्षित व तरूण होती. त्यांनी घटना निर्मितीचा तांत्रिक मुद्दा उपस्थित करून "दुरूस्त रिपब्लिकन" नावाचा पक्ष निर्माण केला. तर जुन्या ना दुरूस्त रिपब्लिकन पक्षामध्ये जुने अनुभवी व अल्पशिक्षीत नेते होते. यामध्ये दादासाहेब गायकवाड, आर. डी. भंडारे, एन्. शिवराज असे नेते होते. त्यामध्ये एकसंघ असणारा हा पक्ष फुटून दोन गट अस्तित्वात आले. या पक्षाच्या फुटीला हे एकमेव कारण नसून त्याला पुढील कारणेसुध्दा कारणीभूत ठरली आहेत.

१) "पक्ष स्थापनेच्या काळचे ऐक्य पक्ष राबवण्याचेवेळीही टिकवणे आवश्यक होते. तशी कायम स्वरूपी यंत्रणा होने गरजेचे होते, कारण बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर जी राजकीय नेतृत्वाची पोकळी निर्माण झाली होती ती भरून निघणे कठीण होते. त्यांचे नेता म्हणून जे मार्गदर्शन आणि सामर्थ्य नव्या रिपब्लिकन पक्षाच्या नेत्यांना लाभणारे नव्हते. तेव्हा प्रमुख लोकांनी व नेत्यांना साक्ष देऊन अशी यंत्रणा निर्माण करायला हवी होती. आणि त्यावर देखरेख ठेवण्यासाठी विस्तरस्त स्वरूपाची यंत्रणा नेमली पाहिजे होती. असे काही प्रयत्न स्थापनेच्या वेळी झाले नसल्याने, किंबहुना नेत्यामधील बेबनाव काहीच होत नसल्याने रिपब्लिकन पक्ष स्थापन होण्याच्या आगोदरच दुभंगलेला होता." १८

या कारणांच्यामुळे व नेत्यामधील सत्ता स्पर्धेमुळे व स्वार्थासाठी हा पक्ष एकसंघ राहू शकला नाही. त्यामुळे या पक्षाच्या फुटीला सुरूवात झाली. परतु हा पक्ष फुटू नये म्हणून तसेच त्याचे गट निर्माण होऊ नयेत म्हणून त्याच्या ऐक्याचेही प्रयत्न झाले होते. यासाठी रिपब्लिकन पक्षाच्या प्रमुखांच्या बैठकीही घेण्यात आल्या. पक्ष ऐक्यासाठी दिनांक १४ नोव्हेंबर,

१९५९ रोजी पंचायत हॉल परेल, मुंबई येथे झालेल्या रिपब्लिकन प्रतिनिधीं-च्या बैठकीप्रमाणे ६ सदस्यांची एक कमिटी नेमण्यात आली. या कमिटीला खालील सदस्य हजर होते.

१) यशवंतराव आंबेडकर (निमंत्रक)
२) एन्. शिवराज
३) दादासाहेब भा.कृ. गायकवाड
४) बी.सी. कांबळे
५) एच्.डी. आवळे
६) आर.डी. भंडारे

दा.मा. जमवते व प्रा.ज. रोहम हे निमंत्रित म्हणून हजर होते. आपल्या प्रास्ताविक भाषणात भैय्यासाहेब आंबेडकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. [१९]

परंतु या सहा महाभागांच्या कमिटीने ऐक्य घडविण्याच्या आतच भैय्यासाहेब आंबेडकरांनी ही कमिटी बरखास्त झाल्याचे जाहीर केले. अशा तऱ्हेने हा पहिला ऐक्याचा प्रयत्न असफल झाला. त्यानंतर मे, १९५९ रोजी दिल्ली येथे आमदार जगन्नाथ भातणकर व खासदार बी.सी. कांबळे यांची बैठक घडवून आणली होती. व ऐक्याची बोलणी झाली होती. परंतु गायकवाड यांच्या समर्थकांनी बी.सी. कांबळे व आवळे यांना नागपूर रेल्वे-स्टेशनवर झेंडे दाखवून दगडफेक केली त्यामुळे यांना ऐक्याचा हा दुसरा प्रयत्नही असफल झाला. १४ मे, १९५९ रोजी नागपूर येथे कांबळे व आवळे गटाचे वेगळे अधिवेशनही पार पडले. रिपब्लिकन पक्षाची शक्ती विघटीत होऊन या पक्षाचे सामर्थ्य नष्ट होईल म्हणून या पक्षाचे अध्यक्ष एन्. शिवराज यांनी या दोन गटात ऐक्य घडवून आणण्याचे ठरवले. त्यासाठी त्यांनी १९ जुलै, १९५९ रोजी मुंबईत बोलाविलेल्या बैठकीत एन्. शिवराज, बॅ.

बॅ. भाऊसाहेब खोब्रागडे, आर.डी. भंडारे, भैय्यासाहेब आंबेडकर, सखाराम मेश्राम, हरिदास आवळे, ए.जी. पवार, बी.सी. कांबळे, डी.टी. रूपवते, एन्.एम्. कांबळे इत्यादी नेते विचार विनिमय करून दरी कशी दूर करता येईल या बद्दलच्या चर्चेत सहभागी झाले होते." २०

परंतु दुर्दैवाने एन्. शिवराज यांची प्रकृती त्या काळातच बिघडल्याने स्वत: एन्. शिवराज बैठकीत हजर राहू शकले नाहीत. त्यामुळे बाकीच्या सदस्यांची पक्ष ऐक्याच्यावर बरीच चर्चा केली. परंतु त्या चर्चेला यश आले नाही. त्यामुळे दिवसें दिवस या पक्षाचे ऐक्य लांबणीवर पडून भविष्य काळात या पक्षाची एकी राहू शकेल ही आशा संपुष्टात आली होती.

त्यानंतर १९६२ साली लोकसभेच्या तिसऱ्या सार्वत्रिक निवडणूका जाहीर झाल्या. या निवडणूकीत दुरुस्त व नादुरुस्त असे दोन्ही रिपब्लिकन पक्षाच्या गटानी सहभाग घेतला. महाराष्ट्रात दुरुस्त गटाने प्रजासमाजवादी पक्षाशी सहकार्य केले तर नादुरुस्त गटाने संयुक्त महाराष्ट्र समितीबरोबर सहकार्य केले. परंतु या सार्वत्रिक निवडणूकीत दोन्ही गटांना प्रचंड पराभव पत्करावा लागला. या दोन्ही गटातून एकही उमेदवार विजयी झाला नाही. त्यामुळे या पक्षाची जनमानसातील प्रतिमा खालावली. त्यामुळे या दोन्ही गटाचे पक्ष ऐक्य व्हावे म्हणून फार मोठा प्रयत्न करण्यात आला. "भैय्या-साहेब आंबेडकर यानी दोन्ही गट एकत्रित करण्यासाठी एक कमिटी नेमली. दोन्ही गटातील मान्यवर नेत्यांना त्यात स्थान देण्यात आले. शुक्रवार दि. २० एप्रिल, १९६२ रोजी आमदार निवास मुंबई येथे पक्षीय ऐक्याच्या करारावर चर्चा झाली. परंतु या चर्चेमुळे पक्षाची ऐकी होऊ शकली नाही. या चर्चेमध्ये भैय्यासाहेब आंबेडकर, दादासाहेब गायकवाड, बी.सी. कांबळे, ॲड. निले आणि दोन्ही गटातील काही मान्यवर नेते उपस्थित होते. त्यांनी

पक्षाच्या ऐक्याबाबत चर्चा करुनही दोन्ही गट तसेच अस्तित्वात राहिले. त्यामुळे विविध गटांना एकत्र आणण्याचे प्रयत्न असफल झाले. उलट आपापसातल्या मतभेदातून या पक्षाचे आणखी तुकडे होत गेले. १९६५ साली दादासाहेब गायकवाड व भंडारे यांच्यात संघर्ष होऊन १९६५ साली भंडारे यांनी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला.

त्यानंतर १९६७ च्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये विदर्भामध्ये आवळे यांनी स्वतंत्र गट स्थापन केला त्यामुळे गायकवाड गट, आवळे गट, व भंडारे गट असे अनेक गट अस्तित्वात आले.

"१९६७ च्या सार्वत्रिक निवडणूकीपूर्वी १ वर्ष म्हणजे १९६६ मध्ये दा.ना. सवते यांनी ऐक्याविषयी प्रयत्न करण्याचा, सभा संमेलनाद्वारे ऐक्याच्या संदर्भात जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. सर्व प्रमुख पुढाऱ्यांना एकत्र करुन त्यांच्यामध्ये समेट घडवून आणण्यासाठी त्यांनी पुण्यात ऐक्य परिषद बोलावली. सर्व प्रमुख पुढाऱ्यांना परिषदेला बोलावले. परंतु या परिषदेला केवळ दादासाहेब गायकवाड सोडल्यास कोणीही प्रमुख पुढारी हजर नव्हते. त्यामुळे हा ऐक्याचा प्रयत्न सफल होऊ शकला नाही." [२१]

१९६६ सालापर्यंत कांबळे गट जवळ जवळ नामशेष झाला होता. त्यामुळे १९७० साली रिपब्लिकन पक्ष पुन्हा फुटला व दादासाहेब गायकवाड व खोब्रागडे गट अस्तित्वात आला. [२२] या घटनेमुळे रिपब्लिकन पक्षात अनेक गट निर्माण होऊ लागले. व त्यातच रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष एन्. शिवराज यांचे २९.९.६४ रोजी दिल्ली येथे निधन झाल्यामुळे या पक्षाचा अध्यक्ष कोण होणार असा प्रश्न निर्माण झाला होता. परंतु हे अध्यक्षपद दादासाहेब गायकवाड यांचेकडे देण्यात आले होते.

त्यानंतर १९६७ साली चौथ्या सार्वत्रिक निवडणूकीत रिपब्लिकन पक्षाने लोकसभेच्या ७२ जागांसाठी आपले उमेदवार उभे केले होते. परंतु या निवडणूकीत उत्तर प्रदेशातून रामजी राम हे एकच उमेदवार विजयी झाले होते. त्यामुळे या पक्षाला बिकट अवस्था प्राप्त झाली होती. दादासाहेब गायकवाड यांना अर्धांगवायूचा झटका आल्याने त्यांच्यानंतर रिपब्लिकन पक्षाचा अध्यक्ष कोण होणार हा प्रश्न १९६९ च्या दरम्यान निर्माण झाला. बॅ. खोब्रागडे यांच्याकडे जाईल असे वाटले. परंतु १९७७ साली गायकवाड गट खोब्रागडे गट हे दोन गट निर्माण झाले होते.

त्यानंतर "दादासाहेब गायकवाड यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या गटास गवई गट असे म्हटले जाउ लागले. त्यांच्या अखिल भारतीय रिपब्लिकन गटाची कार्यकारिणी पुढील प्रमाणे होती.

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | - | रा.सु. गवई (महाराष्ट्र) |
| उपाध्यक्ष | - | आर. मुगुम (कर्नाटक) |
| सेक्रेटरी | - | एन्.एच्. कुंभार (महाराष्ट्र) |

तर अखिल भारतीय खोब्रागडे गटाच्या कार्यकारिणीमध्ये खालील व्यक्तिंचा समावेश होतो.

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | - | बॅ. राजाभाऊ खोब्रागडे (महाराष्ट्र) |
| उपाध्यक्ष | - | श्रीमती जे. ईश्वरीबाई (आंध्र) [२३] |
| सेक्रेटरी | - | श्री डी.ए. कट्टी (कर्नाटक) |

दादासाहेब गायकवाड व शांताबाई दाणी ही दोघे एकत्र रिपब्लिकन पक्षाचे कार्य करत होते. परंतु दादासाहेबांच्या मृत्यूनंतर रा.सु. गवई व

शांताबाई यांच्यात संघर्ष झाल्यामुळे शांताबाई दाणी यांनी परत दादासाहेब गायकवाडगट स्थापन केला.

त्यानंतर १९७१ च्या सार्वत्रिक निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाच्या विविध गटामधून २९ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात उतरले होते. परंतु त्यावेळी बॅ. खोब्रागडेंचा गट कॉंग्रेस विरोधी होता, तर गायकवाड गटाने कॉंग्रेसबरोबर युती केली होती. या निवडणूकीत गायकवाड गटातून फक्त एक उमेदवार बी.सी. कांबळे पंढरपूर मतदार संघातून विजयी झाले. [२४] त्यामुळे या पक्षाला आणखी उतरती कळा लागली. त्यामुळे हया पक्षाचे अस्तित्व राजकारणात उरले नाही. त्यामुळे सुरुवातीच्या कालखंडामध्ये या पक्षाच्या माध्यमातून लोकसभेत व विविध प्रांताच्या विधानसभेमध्ये या पक्षालाचांगले यश मिळत होते. लोकसभेत तर सुरुवातीच्या काळात या पक्षाने समर्थ विरोधी पक्षाची भूमिका पार पाडून आपला प्रभाव सरकारवर पाडलेला होता. परंतु नंतरच्या गटबाजीमुळे व फाटाफुटीमुळे हा पक्ष सामर्थ्यहीन बनला. कॉंग्रेसला समर्थ असा असणारा हा विरोधी पक्ष नंतरच्या काळात विरोध न करता या पक्षातील अनेक नेते कॉंग्रेसमध्ये जाऊन विविध पदांच्या अपेक्षेने त्यांनी रिपब्लिकन पक्ष खिळखिळा केला. आर.डी. भंडारे, दा.ना. खवते यांनी कॉंग्रेसमध्ये प्रवेश करुन सत्तेत सहभाग घेतला तर रा.सु. गवई यांनी कॉंग्रेस पक्षाच्या मदतीने विधान परिषदेवर उपाध्यक्ष म्हणून काही काळ पद भुषविले. तर ते आतापर्यंत विधान परिषदेवर कॉंग्रेसच्या सहकार्यानेच प्रवेश करुन सत्तेत निवडून येत असतात. त्यामुळे रिपब्लिकन पक्ष हा पूर्णत: विभागला गेला. या विभाजनाला कंटाळून १९७४ साली भैय्यासाहेब आंबेडकर यांनी परत रिपब्लिकन पक्षात ऐक्य घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आपल्या मुलाखतीमध्ये सांगितले की, "१९७४ च्या जानेवारीत मी माझ्या सहीने एक पत्रक काढले व आमदार निवासात आपल्या सर्व रिपब्लिकन पुढा-यांची बैठक बोलावली.

आपण सर्व एकत्र यावे, आपापसातील मतभेद विसरावेत, बाबासाहेबांचे कार्य जोमाने पुढे न्यावे, हा उद्देश या पत्रकात मी स्पष्ट केला होता. बैठकीस मी, राजाभाऊ खोब्रागडे, बी.सी. कांबळे, रा.सु. गवई, घन:शाम तळवरकर व इतर १० ते १५ कार्यकर्ते उपस्थित होते. या बैठकीत सर्व मतभेद विसरून"आम्ही सर्व एक झालो" अशी घोषणा केली." [२५] व ही घोषणा लोकांच्यासमोर जाहीर करण्यासाठी २६ जानेवारी, १९७४ ला चैतन्य भूमिवर एक विराट सभा झाली. या सभेमध्ये बाबासाहेबांच्या पवित्र स्मृतीस साक्ष ठेवून एकत्र आल्याची घोषणा झाली. नेत्यांच्या संघर्षामुळे व परस्परातील हेव्यादाव्यामुळे फुटी व गट कायम राहिले.

पुढे १९७७ च्या सार्वत्रिक निवडणूकीच्यामध्ये गायकवाड गटाने कॉंग्रेस पक्षाशी युती केली तर बी.सी. कांबळे यांनी जनता पक्षातूनच निवडणूक लढवली, तर बॅ. खोब्रागडे यांनी जनता पक्षाबरोबर युती करुन दोन उमेदवार उभे केले ते विजयी झाले. (कचरूलाल जैन व डी.सी. गवई) तर १९७८ च्या महाराष्ट्र विधानसभांच्या निवडणूकीत ७ उमेदवार आमदार म्हणून निवडून आले. त्यात गायकवाड व कांबळे गटाला प्रतिनिधीत्व मिळाले.

या कालखंडामध्ये रिपब्लिकन पक्ष जवळ जवळ नष्टप्राय होत चालला होता. रिपब्लिकन पक्षातील पुढारी हे दुस-या विविध राजकीय पक्षाला जावून मिळत होते. त्यामुळे या पक्षाला दलित समाज कंटाळला होता. त्यांच्यात नैराश्याची भावना निर्माण झाली होती. आणि या काळातच राजकारण विरहीत दलित समाजाची एक लढावू संघटना "दलित पॅंथर" उदयास आली व ९ जुले, १९७२ रोजी "दलित पॅंथर" ची स्थापना झाली. "खेडयातील सत्तेचे विकेंद्रीकरण, त्यामुळे एका जातीच्या हातात आलेले सत्तेचे केंद्रीकरण, शिवसेनेची जातीय विषवल्ली, रिपब्लिकन पक्षाचा नामर्दपणा, विरोधी पक्षीयांचे मतलबी प्रेम या पार्श्वभूमीवर दलित पॅंथरची स्थापना झाली होती." [२६]

या दलित पँथर लढावू संघटनेने दलितांवरील अत्याचारावर समर्थपणे लढा दिला. परंतु नंतरच्या काळात या संघटनेमध्ये विविध प्रवाह निर्माण होऊ लागले. नामदेव ढसाळ हे मार्क्सवादी विचारसरणीकडे झुकत चालले, तर राजा ढाले हे आंबेडकर वादाकडे झुकत चालले. त्यामुळे या पँथरमध्ये मार्क्सवाद की आंबेडकरवाद हा संघर्ष सुरु झाला. त्यामुळे पहिल्या पँथरच्या अधिवेशनात या दोघांनाही काढून टाकले. त्यामुळे नंतर ढाले व ढसाळ गट निर्माण झाले. तर राजा ढाले यांनी पँथर बरखास्त झाल्याचे जाहीर करुन टाकले. त्यामुळे नंतरच्या काळात मास मुव्हमेंट भारतीय दलित पँथर, सम्यक क्रांती अशा संघटना निर्माण झाल्या. सुरवातीपासूनच प्रकाश आंबेडकर हे दलित पँथर संघटनेत नव्हते. सुरुवातीच्या काळात रिपब्लिकन पक्षाच्या पहिल्या पिढीमध्ये एन्. शिवराज, दादासाहेब गायकवाड, खोब्रागडे, भंडारे इत्यादीकार्यक्षम नेते होते. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे नेतृत्व रा.सु. गवई, शांताबाई दाणी इत्यादी दुसऱ्या पिढीकडे आले व त्यानंतर दलित पँथरमधील रामदास आठवले यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट), प्रकाश आंबेडकर हे या काळात आले व त्यांनी भारतीय रिपब्लिकन पक्ष, रा.सू. गवई यांनी अखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष, तर जोगेंद्र कवाडे यांनी दलित मुक्ती सेना हे पक्ष स्थापन केले. त्यामुळे रिपब्लिकन पक्षाचे नेतृत्व तिसऱ्या पिढीकडे आले.

त्यानंतर १९८४ साली रा.सु. गवई व खोब्रागडे यांनी एकत्र येण्याचा निर्णय घेतला होता. परंतु ऐक्य होवू शकले नाही. १९८९ साली हे सर्व गट एकत्र आले आणि पक्ष एकत्र घडून आले होते. त्याला खालील परिस्थिती कारणीभूत झाली होती.

"१० आक्टोबर, १९८९ रोजी सिध्दार्थ कॉलनी चेंबूर, मुंबई-७१ येथील झालेल्या अमानुष गोळीबारात अनुक्रमे सुहास कांबळे, कु. अलका जाधव व भीमराव

नेटावटे हे तीन जीव शहीद झाले. त्या दिवसापासून या वसाहतीच्या तरुणांच्या मनात आपापसातील दुहीचा असंतोष खदखदत होता. त्याचे प्रत्यंतर म्हणजे शहीदांच्या अंत्ययात्रेत सामील झालेल्या दलित नेत्यांना हजारो मुखांनी ऐक्याची भाषा सुनावली, नव्हे तर या अन्याय अत्याचाराच्या मागे केवळ तुमचे सवते सुभेच कारणीभूत आहेत. अशीही जळजळीत टीका होत होती. या घटनेने सारा समाजच प्रक्षुब्ध झाला होता." [२७] या तरुणांनी ५ डिसेंबर, १९८९ पासून उपोषणास प्रारंभ केला. या उपोषणात एकूण ९ जण सामील झाले होते. या तरुणांनी ४ दिवस आमरण उपोषण केले. या उपोषणाला, रामदास आठवले, रा.सु. गवई इत्यादी प्रमुख नेत्यांनी भेट दिली. या उपोषणाचा मुख्य उद्देश "ऐक्य व्हावे" असा होता. या संदर्भात एक बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीला प्रकाश आंबेडकर (भारतीय रिपब्लिकन पक्ष), बी.सी. कांबळे (रिपब्लिकन पक्ष कांबळे गट), रा.सु. गवई (रिपब्लिकन पक्ष गवई गट), हरिशचंद्र रामटेके (रिपब्लिकन पक्ष खोब्रागडे गट), रामदास आठवले (दलित पँथर) या प्रमुख नेत्यांचा समावेश बैठकीत होता.

व दिनांक १९ डिसेंबर, १९८९ रोजी रिपब्लिकन ऐक्याचा ठराव झाला. या ठरावात पुढील कलमे होती.

१) डॉ. आंबेडकरांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा एक तुल्यबळ विरोधी पक्ष निर्माण करावा या इराद्याने भारतीय जनतेस उद्देशून जे खुले पत्र लिहिले त्यावर आम्हा सर्वांचे एकमत असून त्या खुल्या पत्रावर व त्यातील सिध्दांतावर अधिष्ठित असा "रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया" पक्ष प्रस्थापित करण्यात आम्ही बांधलेले आहोत.

२) त्यासाठी दि. ५ जानेवारी ते ६ जानेवारी या दोन दिवशी तमाम जनतेने खुले अधिवेशन मुंबईत घेण्याचा निर्णय आम्ही सर्वजण घेत आहोत.

३) वरील गोष्टींची पूर्तता करण्यासाठी आम्ही आपल्या संघटना विसर्जित करण्याचा निर्णय घेतला असून मध्यंतरीच्या काळासाठी प्लॅनिंग सेशन बोलाविण्याकरिता व जर काही आकस्मिक व महत्त्वाची राजकीय घडामोड उद्‌भवल्यास त्याचा विचार विनिमय करण्याकरता या संघटना व पक्ष विसर्जित करण्यात आल्या आहेत. त्यांची एक ॲडव्हाक कमिटी स्थापन करण्यात येत आहे. सदर कमिटीची पहिली बैठक दि. २५ डिसेंबर रोजी घेण्यात येईल.

४) सदर कमिटीचे सभासद विसर्जित झालेल्या संघटनांचे पक्षाचे प्रत्येकी एक प्रमुख असतील. ही बैठक बोलविण्याचा अधिकार श्री रामदास आठवले यांना देण्यात आला आहे.

आम्ही पुढे असे जाहीर करतो की, आम्ही वेगवेगळ्या पक्षाशी असलेल्या युत्या व संबंध तोडत असून यापुढे कुठल्याही युत्या राजकीय वाटाघाटी स्वतंत्रपणे करणार नाही. तसेच मारक होतील अशा मुलाखती किंवा निवेदने किंवा पत्रके वर्तमान पत्राला देणार नाही वा जाहीर सभेतून ऐक्याविरोधी बोलणार नाही." २८ असा ठराव करून रिपब्लिकन पक्षाचे पुन्हा ऐक्य झाले. परंतु थोडयाच कालावधीमध्ये २२ डिसेंबरला प्रकाश आंबेडकरांनी दूरदर्शनला मुलाखत दिली व नवा रिपब्लिकन पक्ष स्वतंत्रपणे निवडणूका लढवील असे घोषित केले. त्यामुळे त्यांनी स्वतंत्र मुलाखत देऊन ठरावातील पहिल्यांदा अट मोडली व तेव्हापासून रिपब्लिकन पक्षाच्या मतभेदाला सुरवात झाली व पक्षफुटीस सुरुवात झाली.

निवडणूकीत कोणत्या पक्षाबरोबर युती करावी हे रिपब्लिकन पक्षामध्ये एकमत होत नव्हते. त्यामुळे रा.सु. गवई व रामदास आठवले

यांनी कॉंग्रेसला सहकार्य करण्याचे ठरवले, तर प्रकाश आंबेडकर यांनी जनता पक्षाला सहकार्य दिले, तर बाकीच्या संघटना एवढया प्रबळ नव्हत्या त्यामुळे त्यांनी इतर राजकीय पक्षांचा आसरा घेतला व अशा त-हेने फार प्रयत्नाने झालेले पक्ष ऐक्य परत नष्ट झाले व विविध गट अस्तित्वात राहिले.

रिपब्लिकन पक्षाच्या स्थापनेपासून आजपर्यंत पक्ष ऐक्याचे अनेक प्रयत्न झाले. परंतु आपआपसातील मतभेद, सत्तासंघर्ष, वैचारिक मतभेद, स्वार्थीपणा इत्यादी कारणामुळे पक्षाला नंतरच्या कालखंडात कधीही संघटितपणा व एकसुत्रीपणा राहिला नाही. हा पक्ष एकसंघ संघटितरित्या का राहू शकला नाही याची अनेकवेळा कारणमिमांसा झालेली आहे. रिपब्लिकन पक्षाच्या नेत्यांनी सुध्दा विविध मते मांडलेली आहेत. या मतांमुळे रिपब्लिकन पक्ष हा संघटीत होऊ शकत नाही. ती मते पुढील प्रमाणे -

दा.मा. भवते यांच्यामते "रिपब्लिकन पक्ष अंतर्गत ऐक्य घडणे अवघडच नव्हे तर अशक्यच होय. असे यावेळी मी म्हणतो त्यावेळी आम्ही फाटाफूटी मुळे भांडणामुळे निराश झालोत. फ्रस्टेड झालोत असा मनभावी अर्थ काही लोक लावतात. तो पूर्णता चूक आहे. माझी त्याबाबतची कारणमीमांसा थोडक्यात देत आहे. रिपब्लिकन पक्ष ऐक्य बनायला काही व्यवहारिक तर काही तात्विक वैचारिक कारणे आहेत. रिपब्लिकन पक्ष संघटन हे कार्यकर्त्यांचे संघटन (पार्टी ऑफ केडर) कधीच बनले नाही. ते नेहमीच केंद्रशासीत (मोनोलिथीक) राहिले. बाबासाहेबांसारखे युगपुरुष नेतृत्व करत होते तो पावेतो हे योग्य व ठीक होते. चळवळीच्या सुरवातीच्या अवस्थेत ते साजजिकच होते. परंतु बाबासाहेबांनंतर प्रत्येक मुखंड (छोटेखानी बाबासाहेब) मिनियचर बाबासाहेब म्हणून वागू लागला आणि दुर्दैव असे की, हया अलग अलग मताचो पती भोवती चेले बालकेची जमली. राईट ऑर राँग गायकवाड, राईट ऑर राँग खोब्रागडे अशा भूमिका कार्यकर्त्यांनीच घेतल्या आहेत. फाटाफूटी

व गटबाजी यामध्ये पुढाऱ्यांचे हितसंबंध (व्हेस्टेड इंटरेस्ट) तयार झालेले त्यामुळे पुढारी एकत्र येणे दुरापास्त. त्यात कार्यकर्त्यांच्या ह्या राईट ऑर रॉंग भूमिकेमुळे त्यांच्या स्वतंत्र दिव्यांना आयते तेल मिळाले." २९

त्यामुळे रूपवते यांच्यामते ऐक्मेकातील हेव्यादाव्यामुळे पक्ष एकत्र येत नाही तर,

२) रामदास आठवले यांच्या मते "रिपब्लिकन ऐक्य होत नाही, आणि झाले तर टिकत नाही ही नित्याचीच बाब झाली आहे. याची कारण-मीमांसा करायची असल्यास अनेक कारणे सांगता येतील. पण बाबासाहेबांचा आणि त्यांच्या लोकशाहीवादी विचारांचा वारसा सांगतांनाच लोकशाही पध्दतीने बहुमताने घेतलेले निर्णय धिडकारण्याचा प्रकार दलित चळवळीत झाला आहे. आणि दुर्दैवाची गोष्ट अशी की, बहुमताने जे निर्णय अमान्य करतात त्यांना ऐक्य मान्य असणारे काही लोक मान्य करतात. त्यामुळेच आपण सर्वमान्य आहोत असे त्याना वाटू लागले. ते आपला वेगळा गट काढतात. गट का काढला आणि चालवला जातो ? लोकांनी पाठिंबा दिला नाहीत तर गट पडणार नाहीत व गटबाजीही टिकणार नाही."३० असे त्यांना वाटते.

३) प्रकाश आंबेडकर यांच्या मते "ऐक्य का टिकत नाही हा प्रश्न सुध्दा असाच आहे. कॉंग्रेस सुध्दा अनेकदा फुटली आहे. पण माझ्यामते रिपब्लिकन ऐक्य जोवर भावनात्मकच राहील तोवर ते मुळीच टिकणार नाही. त्यासाठी भावनात्मक ऐक्याच्या संकल्पनेतून प्रथम बाहेर पडले पाहिजे. राजकीय शक्ती म्हणून तुम्ही उभे राहू इच्छिता की नाही हाच खरा प्रश्न आहे. तसेच राजकीय परिस्थितीनुसार निर्णय घ्यायला पाहिजे. तरच ऐक्य टिकेल असे मला वाटते." ३१ असे मत पक्षऐक्याविषयी प्रकाश आंबेडकरांनी मांडले तर -

४) रा.सु. गवई यांच्या मते "माझ्या माहितीप्रमाणे डॉ. आंबेडकर यांच्या महानिर्वाणानंतर १९५७ साली रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाली. बाबासाहेबांनी मांडलेली संकल्पना निश्चित केलेली घटना आणि त्यांचीच ध्येय-उद्दिष्टे समोर ठेवून निर्माण झालेल्या या पक्षाच्या स्थापनेत कर्मवीर दादासाहेब गायकवाड, एन्. शिवराज, बॅ. राजाभाऊ खोब्रागडे आदींचा पुढाकार होता. पण ३० ऑक्टोबर, १९५८ साली त्या पक्षात पहिली फुट पडली, एकीकडे दादासाहेब गायकवाड, एन्. शिवराज, बॅ. खोब्रागडे आदींचा पुढाकार तर दुसरीकडे बी.सी. कांबळे, आवळे, दादासाहेब रुपवते असे दोन गट झाले. कोणत्याही तात्विक कारणापेक्षा मोठेपणाची अभिलाषा आणि वैयक्तिक द्वेष मत्सरापोटीच ही फूट पडली, ही पहिलीच फूट जर टाळता आली असती तर त्यांच्याजवळ डॉ. बाबासाहेबांच्या हयातीत त्यांच्या हिमालयासारख्या उत्तुंग नेतृत्वामुळे श्रध्देने लोक चळवळीत होते. कोणत्याही विशेष तयारीशिवाय त्यांच्या एका हाकेवर सर्व साधन सामुग्री उभी रहायची. त्यामुळे संघटनात्मक बांधणी, केडर्स निर्मिती, त्याच प्रशिक्षित आदि महत्व-पूर्ण गोष्टीही अनावश्यक वाटल्याने दुर्लक्षित राहिल्या. त्यामुळेच नेत्यां-मध्ये गट पडताच कोणत्याही पक्षाची झाली नाही इतकी वाताहत रिपब्लि-कन पक्षाची झाली असावी. अर्थातच पहिल्या दुर्दैवी फुटीनंतरही दादासाहेब गायकवाड यांनी रिपब्लिकन पक्षाचे १९६४ पर्यंत समर्थपणे नेतृत्व केले. बाबा-साहेबांच्या पश्चात ते एकमेव लोकनेते होते. त्यामुळे १९५८ च्या फुटीचा विशेष परिणाम न होता त्यांच्या नेतृत्वाखाली भूमिहिनांचा अभूतपूर्व देशव्यापी सत्याग्रह यशस्वी झाला होता. परंतु १९७१ साली पक्षात दुसरी फूट पडली. बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांनी आपला वेगळा गट स्थापन केला, अर्थात गटबाजीचा तपशील आज महत्त्वाचा नाही. पण रिपब्लिकन पक्ष ते दलित पँथर पर्यंतची सर्व गटबाजी वैयक्तिक स्वार्थासाठीच झालेली आहे." [३२]

अशी वरील विविध मते पक्ष फुटीबाबत व ऐक्याबाबत मांडलेली दिसतात. रिपब्लिकन पक्षाच्या नाकर्तेपणास कंटाळून मध्यंतरीच्या कालावधीत लढाऊ तरुणांची दलित पँथर ही संघटना निर्माण झाली होती. परंतु नंतरच्या कालखंडात ही संघटना बरखास्त झाली होती. त्याबाबत नामदेव ढसाळ म्हणतात, "जुने रिपब्लिकन नेते आपापले गट तट टिकविण्यात मग्न असतानाच दलितांवरील अत्याचाराच्या घटना दिवसागणिक व्हायला लागल्या. त्यावेळी पुरोगामी परिवर्तनवादी चळवळी - पक्ष सुद्धा ताकदवान राहिले नव्हते. अशा परिस्थितीत अत्याचारास निमित्त होऊन दलित पँथर उदयास आला. पण थोड्याच कालावधीत याही चळवळीची रिपब्लिकन पक्षाप्रमाणे वाताहत झाली. रिपब्लिकन पक्षाच्या वाताहतीचा इतिहास समोर ताजा असतानाही आत्मपरीक्षण न करण्याची चूक पँथर चळवळीने केली. व रिपब्लिकन ऐक्याबाबत बोलायचे झाल्यास गेल्या विधानसभा निवडणूकापूर्वी ऐक्यासाठी कधी नव्हे इतके समाजमत आणि वातावरण तयार झाले होते. पण प्रत्येक नेत्याचा स्वार्थ वेगवेगळा होता. त्यातील प्रत्येकाला आपल्या स्वार्थानुरूप तडजोड हवी होती. १९८९ साली झालेल्या ऐक्य टिकले नाही." [३३]

अशा विविध प्रतिक्रिया या चळवळीतील लोकांनी व्यक्त केलेल्या आहेत. ही ख-या अर्थाने रिपब्लिकन पक्षाची व दलित चळवळीची शोकांतिका आहे. असे म्हणावे लागते. रिपब्लिकन पक्षात अनेक गट निर्माण झाले व ते गट विलीन करुन पक्ष ऐक्याचेही भरपूर प्रयत्न झाले. परंतु ख-या अर्थाने १९५८ पासून आजपर्यंत रिपब्लिकन पक्ष एकत्र येऊ शकला नाही. याची आणखी बरीच कारणे आहेत. रिपब्लिकन पक्ष हा वेगवेगळ्या गटात विभागला जावा आणि त्यांची ताकद कमी व्हावी असे काही जणांना राजकीय दृष्टिकोनातून वाटत असते. रिपब्लिकन पक्ष एकत्र न येण्याला आणखी पुढील कारणे

कारणीभूत आहेत. म्हणून आजतागायत हा पक्ष संघटित राहू शकला नाही. आणि ऐक्य झालेतरी ते फार काळ टिकले नाही. रिपब्लिकन नेत्यातील अशिक्षित व सुशिक्षित वाद, पक्ष संघटनेचा अभाव, सत्ता संघर्ष, नेतेपदा-साठी स्पर्धा, एकमेकावर हीन व स्वार्थी आरोप, नेत्यांमधील स्वार्थीपणा व नेत्यांच्या विचारात असलेला फरक आणि विरोधी पक्षाची स्वार्थी वृत्ती या विविध कारणांच्यामुळे पक्ष एकत्र येऊ शकला नाही. आणि आलातरी तो एकसंघ राहू शकला नाही. त्यामुळे रिपब्लिकन पक्षात अनेक गट निर्माण झालेले आहेत.

## रिपब्लिकन पक्षाची (विविध गटांची) कार्ये :

रिपब्लिकन पक्षातील विविध गट व त्यांच्यातील संघर्ष पहाता या पक्षाने दलितांच्या व्यापक हितासाठी किंवा आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्या-साठी काही कार्ये अथवा विधायक भूमिका पार पाडल्या किंवा नाहीत, पक्षाच्या ध्येय व उद्दिष्टांनुसार त्यांनी आतापर्यंत कोणती व्यापक धोरणे अंमलात आणली ? विविध गटांच्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्रात व अखिल भारतीय पातळीवर कोणत्या भूमिका पार पाडल्या ? ते या कार्यात कशा प्रकारे यशस्वी झाले ? याचा आढावा घेणे आवश्यक आहे. रिप-ब्लिकन पक्ष स्थापनेपासून १९५७ ते १९५९ पर्यंत हा पक्ष एकसंध असतांना त्यांनी अखिल भारतीय पातळीवर व्यापक भूमिका पार पाडलेल्या दिसतात. या कालखंडात पक्षात जरी दोन गट अस्तित्वात असले तरी, या पक्षाची प्रतिमा, कार्य, सामर्थ्य व दृष्टिकोन चांगल्या प्रकारचा होता. या कालखंडात रिपब्लिकन पक्ष सर्व भारतातील काना-कोपऱ्यात जाऊन पोहचला होता. नंतरच्या काळात मात्र या पक्षाचे अनेक गटात विभाजन झाल्याने त्याचे सामर्थ्य कमी होऊन त्यांनी फारशी कार्ये केली नाहीत. परंतु इ.स. १९६० ते १९९४ या ३४ ते ३५ वर्षाच्या कालखंडात पुढील प्रकारची कार्ये केलेली दिसतात.

(१) १९६० ते १९६४ च्या कालखंडात केलेली कार्ये :

या कालखंडात इ.स. १९६२ साली देशातील सार्वत्रिक निवडणूका झाल्या होत्या. रिपब्लिकन पक्षातर्फे निवडणूकीची ही पहिलीच वेळ होती. या आगोदरच्या निवडणूका "शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनच्या" पक्षावर पार पडलेल्या होत्या. या निवडणूकीत रिपब्लिकन पक्षाने लोकसभेसाठी देशात ६९ उमेदवार उभे केले होते, परंतु त्यामध्ये केवळ ३ उमेदवार लोकसभेत विजयी झाले व ते सर्व उत्तर प्रदेशातील होते. अलीगड मतदार संघातून बुध्दप्रिय मौर्य मोरादाबाद मतदार संघातून मुज्जफर हुसेन व हाथरस मतदार संघातून ज्योतीस्वरूप हे तीन उमेदवार विजयी झाले होते. या निवडणूकीत लोक-सभेच्या ४९४ जागापैकी ३६१ जागा काँग्रेसला मिळाल्या होत्या. परंतु गेल्या निवडणूकीच्या तुलनेने रिपब्लिकन पक्षाला फक्त तीनच जागा मिळाल्या. तर महाराष्ट्र विधान सभेच्या निवडणूकीत फक्त ३ उमेदवार विजयी झाले होते.

या पक्षाने या कालखंडात खालील कार्ये केलेली आहेत -

१. रिपब्लिकन पक्षाच्या वतीने विविध मागण्यांचे निवेदने घेऊन एक शिष्टमंडळ दि. ७ मार्च, १९६० ला महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री यशवंत-राव चव्हाण यांना भेटले. त्या शिष्टमंडळामध्ये खासदा दादासाहेब गायकवाड, खासदार बी.के. माने, आमदार आर.डी. भंडारे, आमदार पी.टी. मधाळे, आमदार दादासाहेब शिर्के, आमदार लोंढे, आमदार चौटे, वासुदेवराव गाणार व केशवराव कांबळे इत्यादी नेते होते. या शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्याना खालील मागण्यांचे निवेदन देऊन त्यावर त्यांच्याशी चर्चा केली.

१) नागपूर येथील दीक्षा मैदानाची जागा ॲक्वायर करून ताबडतोब आम्हास यावी.

२. भूमिहिन सत्याग्रहामुळे मुंबई सरकारने रिपब्लिकन पक्षाच्या मान्य केलेल्या मागण्याप्रमाणे भूमिहिनांना ताबडतोब जमिनी वाटून याव्यात.

३. बौध्दांना त्यांची आर्थिक बाब लक्षात घेऊन ताबडतोब पूर्वीच्या शेड्यूल्ड कास्टच्या सवलती जाहीर कराव्यात.

४. खानदेशात आदिवासी मजूर शेतक-यांवर तेथील शेत मालकांनी अत्याचार चालू केलेले आहेत. ते दूर होऊन त्यांना संरक्षण मिळावे.[34]

वरील प्रकारच्या मागण्या या शिष्टमंडळाने केल्या होत्या. या मागण्यामध्ये प्रामुख्याने पहिली मागणी महत्त्वाची होती. कारण नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौध्द धर्माचा स्वीकार केला होता. त्यामुळे ती पवित्र जागा सरकारने या पक्षाला यावी असे निवेदन केले होते. तसेच भूमिहीन मजूरासाठी, दलितांसाठी पडिक जागा सरकारने कसायला देऊन त्यांचे दारिद्र्य दूर व्हावे यासाठी दुसरी मागणी केली. बौध्द धर्मीय लोकांना त्यांच्या मागासवर्गीय जातीच्या सर्व सवलती मिळाव्यात म्हणून ही तिसरी मागणी केली होती. वरील चार मागण्यावरून रिपब्लिकन पक्षाने दलितांच्या एकूण व्यापक हितासाठी कशी निवेदने सादर केली हे दिसून येते. त्यामुळे या निवेदनावर मुख्यमंत्र्यानी सहानुभूतीपूर्वक विचार करण्याचे आश्वासन दिले होते.

अशा प्रकारे रिपब्लिकन पक्षाने या कालखंडात दीक्षा भूमिचा पाठपुरावा करून जागा मिळवून दिली.

२. रिपब्लिकन पक्षाचे तिसरे अधिवेशन अलिगड येथे दि. २५ व २६ नोव्हेंबर १९६१ रोजी भरले होते. या अधिवेशनात अध्यक्ष एन्. शिवराज

होते. रिपब्लिकन पक्षाचे बी.पी. मौर्य या खासदारांच्या सहकार्याने हे अधिवेशन चांगल्यारीतीने पार पडले होते. या अधिवेशनात रिपब्लिकन पक्षाच्या वतीने खालील ठराव मंजूर करण्यात आले.

१. भारत सरकारने आपले नरमाईचे धोरण सोडून चिनी आक्रमणांना भारतीय हद्दीतून हुसकून धावे.

२. जरूर पडल्यास बळाचा वापर करून का होईना पण गोव्याला परकीय दास्यातून मुक्त करावे.

३. पंचवार्षिक योजनामुळे अनुसूचित जमातीचे काहीच कल्याण झाले नाही. तरी त्यांचे कल्याणासाठी प्रयत्न केले जावेत. त्यांच्या आर्थिक परिस्थितीची पहाणी करण्यासाठी पाय सुचविण्यासाठी एका उच्चाधिकार कमिशनची स्थापना करावी.

४. भूमिहिन मजूरांना पडिक जमिनीचे वाटप करण्यात यावे.

५. बहुजनांच्या हिताच्या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये प्रवेश घेतांना विरोध असू नयेत. तसेच अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप देतांना उत्पन्नाची अट त्यांच्यावर लादू नये.

६. जम्मू - काश्मीरमध्ये अप्रत्यक्ष निवडणूकांऐवजी प्रत्यक्ष निवडणुकीच्या पध्दतीने लोक प्रतिनिधी निवडले जावेत.[३६]

७. जम्मू काश्मीर मध्येही अनुसूचित जाती जमातीच्या विशेष सवलती दिल्या जाव्यात, जम्मू काश्मीर सरकारने ही मागणी मंजूर करावी यासाठी भारत सरकारने आपले वजन खर्च करावे.

रिपब्लिकन पक्षाने संपूर्ण देशाचे व्यापकहित लक्षात घेऊन व भारताच्या सार्वभौमत्वासाठी पहिल्या दोन ठरावास मंजूरी दिली होती. तर पंचवार्षिक

योजनेत दलितांसाठी व मजूरासाठी विशेष तरतूद असावी यासाठी मागणी केली होती. याशिवाय एन्. शिवराज यांनी लोकसभेत हा प्रश्न उचलून धरला होता व सरकारवर टीका केली होती. १९५१ साली बाबासाहेब आंबेडकरांनी पडिक जमिनी भूमिहीनांना मिळाव्यात असे म्हटले होते. त्याची कारवाई सरकारने करावी म्हणून चौथा ठराव करण्यात आला होता. विद्यार्थ्यांना जे विद्यावेतन मिळते त्यासाठी उत्पन्नाची अट ठेवू नये हा ठराव देखील पक्षाने केला होता. तर जम्मू काश्मीरच्या निवडणूकीसाठीही ठराव केलेला दिसतो. या अधिवेशनात देशाच्या व्यापक दृष्टीकोनातून ठराव मांडलेले दिसतात.

३. दुरुस्त रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष हरिदासजी आवळे यांनी १९६१ साली दलित समाजातील विभिन्न स्तरातील एकतेसाठी प्रयत्न केला. नागपूर हाय कार्टाने दि. १४.१०.५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेली बौध्द धर्माची दीक्षा अवैध ठरविली. या निकालाविरुध्द श्री आवळे यांनी सुप्रिम कोर्टात अपिल केले होते. १९६४ साली सुप्रिम कोर्टाने निकाल देतांना म्हटले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लाखो दलितांना दिलेली दीक्षा वैध स्वरूपाची ठरते.[३७] यामुळे आवळे यांचा विजय झाला होता.

हरदासजी आवळे हे विदर्भातील रिपब्लिकन पक्षाचे नेते होते. त्यांनीही आपल्या कारकिर्दीत अनेक कार्ये केली होती.

४) भूमिहीनांचा सत्याग्रह - भूमिहिनांसाठी या कालखंडात रिपब्लिकन पक्षाच्या वतीने दिलेल्या देशव्यापी लढयामुळे संपूर्ण भारतातील लोक या पक्षाकडे चांगल्या दृष्टीकोनातून पाहू लागले. या लढयाचे रिपब्लिकन पक्षाच्या इतिहासात फार महत्व आहे. कारण रिपब्लिकन पक्षाच्या नंतरच्या

काळात एवढा मोठा ऐतिहासिक लढा नंतर झालेला दिसत नाही. त्याची हकिक्त अशी, "रिपब्लिकन पक्षाचे ३,४,५ जानेवारी १९६४ ला गुजरात प्रांतात अहमदाबाद येथे अधिवेशन भरले होते. रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष एन्. शिवराज, दादासाहेब गायकवाड, बी.पी. मौर्य व इतर विविध रिपब्लिकन पक्षाने उभारलेल्या व यश संपादन केलेल्या अनेक चळवळींच्या त्यात उहापोह करण्यात आला. भूमिहिनांना जमिनी मिळाल्याच पाहिलेत अन्यथा तीव्र आंदोलन रिपब्लिकन पक्ष भविष्यात उभारेल असा सरकारला इशारा देण्यात आल आणि या इशा-याची अंमलबजावणी करण्यासाठी एन्. शिवराज यांच्या मार्गदर्शनासाठी दादासाहेब गायकवाड यांनी एका कार्यक्रमाची आखणी करुन १ ऑक्टोबर, १९६४ रोजी देशाच्या विविध प्रांतातून एक लाख लोकांनी दिल्लीच्या लाल किल्यावर एकत्र येऊन संसदेवर चढाई केली. या मोर्चाचे नेतृत्व दादासाहेब गायकवाड यांनी केले. या मोर्चाचे तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांना दहा मागण्यांचे निवेदन दिले. ते पुढीलप्रमाणे -

१) भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तैलचित्र लोकसभेच्या केंद्रीय सभागृहात लावण्यात यावे.
२) देशातील शेतीला लायक असलेली जमीन कसणा-यांनाच देण्यात यावी.
३) पडिक जमिनीचे वाटप भूमिहिंनाना करण्यात यावे.
४) अन्नधान्याचे पुरेशा प्रमाणात वाटप करण्यात यावे. आणि वाढत्या महागाईला आळा घालण्यात यावा.
५) झोपडपट्टी आणि गलिच्छ वस्त्यांची सुधारणा करण्यात येऊन झोपडपट्टीत राहणा-या लोकांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यात यावी.
६) १९४८ चा किमान वेतन कायदा सर्व उद्योगधंद्यांना अवलंबिण्यात यावा.

यात भूमिहिन शेतमजूर व अशिक्षित मजुरांचा समावेश करण्यात यावा.

७. अनुसूचित जातींच्या सवलती व हक्क बौध्दांना देण्यात यावेत.

८. दलितांवरील होत असलेल्या अन्याय अत्याचारावर त्वरीत पायबंद घालण्यात यावा.

९. अस्पृश्यता निवारण कायद्याची योग्य अंमलबजावणी व्हावी व संबंधित गुन्हेगारांना कडक शिक्षा देण्यात यावी.

१०. अनुसूचित जाती जमातीचे आरक्षण त्वरीत भरण्यात यावे व मागील अनुशेष १९७० पूर्वी भरण्यात यावेत. [३८]

हा परिपूर्ण असा मागण्यांचा खलीता सरकारला प्रचंड मोर्चाद्वारे सादर करण्यात आला होता. परंतु नंतर या निवेदनावर सरकारने विशेष दखल घेतल्याचे दिसत नाही. म्हणून ६ डिसेंबर, १९६४ पासून परत सत्याग्रह करण्याचा निर्णय घेण्यात आला.

६ डिसेंबर - सत्याग्रहाचा लढा -

दि. ६ डिसेंबर, १९६४ रोजी प.पू.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ८ व्या पुण्यतिथीचा दिन याच दिवशी अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाच्या मध्यवर्ती कार्यकारणीच्या राष्ट्रव्यापी सत्याग्रहाच्या लढयाला सुरवात करण्यात येईल. दि. १ ऑक्टोबर, १९६४ रोजी रिपब्लिकन पक्षाच्या विद्यमाने अखिल भारतीय स्वरूपाचा एक प्रचंड मोर्चा लोकसभेपुढे नेण्यात आला. त्यावेळी रिपब्लिकन जनतेने जी सनदशिररित्या व न्याय हक्काच्या मागणीसाठी शिस्तबध्द निदर्शने केली. त्याचवेळी सत्ताधारी पक्षाच्या प्रमुख नेत्यानी आपल्या मागण्यांचे निवेदनही सादर केले होते. परंतु त्या निवेदनात विचार केलेल्या मागण्यांचा सत्ताधारी सरकारने सहानुभूतीपूर्वक विचार करण्याचे आश्वासन

देऊनही अजूनही कोणत्याही स्वरूपाची हालचाल किंवा उत्तर परत पाठवलेले नाही. मध्यंतरी गेल्याच महिन्यात भारताचे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री मुंबईस आले त्यावेळी त्यांनी रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांना खास ट्रंककॉल करून भेटीस बोलावले. उभय नेत्यांनी आपल्या मागण्या व गाऱ्हाण्यासंबंधी बोलणी झाली. त्यावेळी पंतप्रधानांनी काय मागण्या कबूल करून या बाबतीत कोणत्या उपाययोजना सरकार करू शकेल याचा शक्य तितक्या लवकर निर्णय कळवू असे आशावादी आश्वासन देऊनही अजून याबाबतीत सरकार मूग गिळून स्वस्त बसल्याचे दृष्टीक्षेपास आल्याने दि. ६ डिसेंबर रोजी सत्याग्रहाची चळवळ सुरू करण्याचा निर्णय रिपब्लिकन पक्षाने घेतला आहे. [३९]

त्यामुळे रिपब्लिकन पक्षाने परत सत्याग्रहाचे स्वरूप व पद्धती पुढील-प्रमाणे असेल.

<u>सत्याग्रहाचे स्वरूप व पद्धती :</u>

१) झोपडपट्टीवाल्यांचा प्रश्न महाराष्ट्र सरकार व मुंबई महानगरपालिका समाधानकारकरीत्या सोडविण्यास असमर्थ ठरल्याने सत्याग्रहांची एक तुकडी मुंबई महानगरपालिका कमिशनरच्या ऑफिसवर जाईल. झोपड-पट्टीवाल्यांना रहाण्यासाठी जागा नसल्याने सत्याग्रही महापौर यांच्या निवासस्थानी जातील, रेसकोर्स व सरकारी व महापालिकेच्या जागेचा ताबा घेऊन तेथे झोपडया बांधतील व त्याचप्रमाणे मंत्र्याच्या बंगल्यावरही सत्याग्रही जाऊन सत्याग्रह करतील.

२) खेडयापाडयावर गोरगरीब अस्पृश्य व बौद्ध जनतेवर जो अन्याय व छळ केला जातो त्याची साधी दखल पोलीस अधिकारी घेत नाहीत. तेव्हा

या प्रश्नाकरीता सत्याग्रही सर्व पोलीस स्टेशनवर सत्याग्रह करतील.

३) अन्नधान्याचा प्रश्न, बौध्दांच्या सवलती सरकार नोकऱ्यात राखीव जागांचे प्रमाण भरुन काढणे, भूमिहिन व शेतमजूरांचा प्रश्न वगैरे सोडविल्यास हे सरकार असमर्थ ठरले आहे. म्हणून सत्याग्रही सचिवालयावर जावून तेथे सत्याग्रह करतील. मंत्र्याच्या कचेऱ्या, अन्नधान्याची गुदामे व फुड्झोन कंट्रोलरच्या ऑफिससमोर सत्याग्रह करतील.

४) भारतीय घटनेचे शिल्पकार प.पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे छायाचित्र लोकसभेच्या सेंट्रल हॉलमध्ये लावण्यासाठी केंद्रीय सरकारचे प्रतिनिधी असलेले राज्यपाल यांच्या राजभवनावर जाऊन सत्याग्रही बैठा सत्याग्रह करतील.[४०]

वरील प्रकारचे स्वरुप व सत्याग्रहाच्या कार्यक्रमाची आखणी तयार करण्यात येऊन, प्रत्यक्षात ६ डिसेंबर, १९६४ रोजी सत्याग्रहास प्रारंभ झाला होता. या आंदोलन काळात एकूण तीन लाख सत्याग्रहींनी स्वत:ला अटक करवून घेतली. तर १३ सत्याग्रहींना वीरमरण प्राप्त झाले. जिल्हा कचेरी, पोलीस स्टेशन, तहसील कार्यालय, न्यायालय व इतर सरकारी कार्यालयावर गटागटाने मोर्चे, निदर्शने व सत्याग्रह करुन कार्यकर्त्यांनी अटक करवून घेतली. आग्रा येथील रिपब्लिकन पक्षाचे कार्यकर्ते प्रेमप्रदीप यांना कुटुंबासह सत्याग्रहात पोलीसांनी अटक केली होती तर भंडारा, चंद्रपूर, नागपूर, सांगली, कोल्हापूर पंजाब, अमरावती इत्यादी ठिकाणी कार्यकर्त्यांना अटक केले होते.

हा सत्याग्रहाचा जोर पाहून आंदोलन काळात लालबहादूर शास्त्री मुंबईहून आल्यानंतर त्यांच्यासमोर रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी निदर्शने केली व त्यात १०० सत्याग्रहींना अटक करण्यात आली. त्यामुळे पंतप्रधानानी चर्चा करण्याचे आश्वासन दिले होते.

अशी विविध प्रकारची कार्ये या कालखंडात रिपब्लिकन पक्षामार्फत करण्यात आली होती.

## १९६५ ते १९६९ चा कालखंड :

या कालखंडात रिपब्लिकन पक्षाचे सामर्थ्य फारच कमी झालेले होते. या पक्षातील प्रमुख व्यक्ती इतर पक्षाकडे आकृष्ट झाल्यामुळे व या पक्षाचे अनेक गट या कालखंडात निर्माण झाले होते. त्यामुळे दलित चळवळीतील याकालखंडात शक्ती कमी झालेली होती. तरीसुध्दा काही थोडया फार प्रमाणावर या काळात कार्ये झालेली दिसतात. एन्. शिवराज या जुन्या कार्यकर्त्यांचे ६४ साली निधन झाल्यामुळे व दादासाहेब गायकवाड हे आजारी असल्यामुळे ते सक्रीय राजकारणापासून अलिप्त झाले होते. या काळात दादासाहेब गायकवाड गट, खोब्रागडे गट निर्माण झाले होते. त्यांची कार्ये पुढील प्रमाणे सांगता येतील.

### १. निवडणूकीतील कामगिरी :

१९६७ साली देशाच्या लोकसभेच्या चौथ्या सार्वत्रिक निवडणूका जाहीर झाल्या होत्या. या निवडणूकांसाठी विविध गटातून रिपब्लिकन पक्षाने ७२ उमेदवार उभे केले होते. परंतु या निवडणूकीत उत्तरप्रदेशातून रामजी राव हे एकच उमेदवार विजयी झाले होते. या निवडणूकीत लोकसभेच्या ५२० जागापैकी २८३ जागा काँग्रेसला मिळाल्या होत्या तर विरोधी पक्ष व अपक्षांना मिळून २३७ जागा प्राप्त झाल्या. परंतु गेल्या दोन्ही निवडणूकीच्या तुलनेने रिपब्लिकन पक्षाला मात्र एकच जागा प्राप्त झाली. याशिवाय रिपब्लिकन पक्षाने विधानसभेच्या निवडणूकीकरता विविध प्रांतातून मिळून

३८१ उमेदवार उभे केले होते. परंतु या निवडणूकीत महाराष्ट्रातून चार, म्हैसूर मधून एक, पंजाबमधून तीन, उत्तर प्रदेशातून दोन, हरियानातून दोन, आंध्रातून दोन व बिहार प्रांतातून एक उमेदवार विजयी झाला होता. या कालखंडाचे वैशिष्टय म्हणजे देशाच्या विविध प्रांतात या पक्षाची लोकप्रियता वाढत चाललेली होती. परंतु लोकसभेत केवळ एकच उमेदवार विजयी झाल्याचे दिसते.

२. रिपब्लिकन पक्षाला द्वि मतदार संघ रद्द केल्यामुळे १९६२ च्या निवडणूकीमध्ये यावे तेवढे यश आले नव्हते. द्वि मतदार संघामुळे १९५७ च्या निवडणुकीत शेडयूल्ड कास्ट फेडरेशन या पक्षाचे जास्त उमेदवार निवडून आले होते. त्यामुळे रिपब्लिकन पक्षाने पूर्वीप्रमाणेच द्वि मतदार संघ चालू ठेवावा अशी शासनाकडे मागणी केली होती. त्यासाठी १३ जुलै, १९६५ ला मुंबईमध्ये पक्षाने एक मोर्चा काढला होता. त्या मोर्चामध्ये जवळपास ५,००० स्त्री पुरूषांनी भाग घेतला होता. [४१]

परंतु भारत सरकारने द्वि मतदार संघ रद्द केला असल्यामुळे व एक प्रतिनिधी मतदार संघ निर्माण करून निवडणुका घेण्याची तरतूद केली असल्यामुळे या मोर्चाचा काही उपयोग झाला नाही. त्यामुळे हा प्रयत्न असफल झाला.

३. १९६६ साली "भीमज्योती" ची कल्पना साकार झाली होती. सारा भारत या वर्षी या ज्योतीकडे विस्मयाने पहात होता. ही भीमज्योत अखिल भारतात गाजली. याचे सर्व श्रेय भैय्यासाहेब आंबेडकर यांना द्यावे लागते ही कल्पना साकार कशी झाली या विषयी भैय्यासाहेब म्हणतात, "प्रत्येक

वर्षी आपण बाबासाहेबांचा जन्मदिन साजर करत असतो, १९६६ साली येणारा जन्मदिन ७५ वा होता. म्हणजे १४ एप्रिल, १९६६ साली येणारा जन्मदिन हा बाबासाहेबांचा अमृत महोत्सवी साजरा करावा. असा एक विचार मनात घोळत होता. मुंबईतील सर्व कार्यकर्त्यांची एक बैठक बुध्दभूषण प्रिंटींग प्रेसच्या गच्चीवर घेतली. बैठकीत एक कमिटी स्थापन केली. त्याचा अध्यक्ष स्वत: मीच होतो. शिवाय दादासाहेब रुपवते कार्यवाह होते तर आर.जी. खके खजिनदार होते व या बैठकीत भीमज्योतीची कल्पना पुढे आली." [४२]

त्यानंतर त्या "भिमज्योती" चा कार्यक्रम तयार करण्यात आला होता. बाबासाहेबांच्या जन्मगाव महू (मध्यप्रदेश) येथे दीप प्रज्वलित करून ती ज्योत मुंबईस १४ एप्रिल, १९६६ ला आणावयाचे ठरले. या मिरवणूकीला सर्व लोकांनी प्रचंड पाठींबा दिला व ठिकठिकाणी या भीमज्योतीचे स्वागत करण्यात आले व या निमित्ताने डॉ. बाबासाहेबांचा विचार लोकापर्यंत जाऊन पोहोचले.

१९७० ते ७४ चा कालखंड -

दिवसेंदिवस रिपब्लिकन पक्षाची ताकद व सामर्थ्य कमी होत चालले होते. त्यामुळे "जहाल विचारांची आंबेडकर विचारांची दलित पॅंथर ही लढावू संघटना ९ जुलै १९७२ रोजी स्थापन झाली होती. रिपब्लिकन नेत्यांचा अनुत्साह, बेफिकीर वृत्ती त्यामुळे जनमानसात त्याची निर्माण झालेली प्रतिमा त्यामुळे दलितांच्यावरील अत्याचारांचे प्रमाण फार मोठया प्रमाणावर वाढलेले होते. या अत्याचाराचा प्रतिकार करण्यासाठी रिपब्लिकन पक्ष सुसंघटित व सामर्थ्यवान राहिला नव्हता, त्यामुळे या पक्षाला तरुण - तुर्क मंडळी कंटाळली

होती व याच पार्श्वभूमीवर "दलित पँथर" ही संघटना स्थापन झाली व संपूर्ण महाराष्ट्रातील दलित तरुण या संघटनेमुळे आकर्षित झाला व या संघटनेच्या माध्यमाने कार्य करु लागला होता व याच कालखंडात २०.१२.१९७१ रोजी कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचे दु:खद निधन झाले होते. त्यामुळे डॉ. बाबासाहेबांच्या चळवळीत असलेला जुना अनुभवी कार्यकर्ता यांचे मार्गदर्शन, त्यांचे संघटन रिपब्लिकन पक्षाला मिळाले नाही, तरी सुध्दा विविध गटांच्या माध्यमाने या कालखंडात थोडी फार कार्ये रिपब्लिकन पक्षाने केलेली दिसतात. ती पुढील -

१) <u>निवडणूकीतील कार्ये</u> :

१९७१ च्या लोकसभा निवडणूकीमध्ये रिपब्लिकन पक्षाच्या विविध गटातर्फे २० उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले होते. या काळात गायकवाड रिपब्लिकन गट हा कॉंग्रेसच्या युतीमध्ये होता. तर खोब्रागडे रिपब्लिकन गट हा कॉंग्रेसविरोधी आघाडीमध्ये होता. या निवडणुकीत पंढरपूर मतदार संघातून (गायकवाड गट) सी.एस. कांबळे हे विजयी झाले. या निवडणूकीत लोकसभेच्या ५१८ जागापैकी ३५० जागा कॉंग्रेसला जागा मिळाल्या होत्या. तर विरोधी पक्ष व इतरांना मिळून १६५ जागा प्राप्त झाल्या. परंतु रिपब्लिकन पक्षाला फक्त एका उमेदवाराचा विजय या निवडणूकीत झाला. तर १९७२ च्या घटक राज्यांच्या विधानसभेच्या निवडणूकीत खोब्रागडे गटाकडून महाराष्ट्रात एक व लोकसभेच्या निवडणूकीत तुलनेने या पक्षाला फारच कमी यश प्राप्त झाले. परिणामी हा पक्ष कमकुवत व दुर्बल बनलेला दिसतो.

२) १९७२ च्या निवडणूकीत महाराष्ट्र विधानसभेतून नानासाहेब देशमुख हे आमदार झाले होते. त्यांनी विधानसभेत रिपब्लिकन पक्षाचे नेतृत्व केले.

विधी मंडळात "वंदेमातरम्" हा प्रश्न निर्माण झाला होता. काही उर्दू शाळांनी त्यास बंदी घातली होती. त्यावेळी देशमुखांनी विधानसभेत रोज स्थगत प्रस्ताव देऊन शासनास हैरान केले, त्यामुळे हा लढा यशस्वी होऊन विधानसभेत सुरुवातीस "वंदे मातरम्" म्हटले जाते.

हा प्रश्न धसास लावून देशमुख यांनी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने देशप्रेम व्यक्त केले होते. याशिवाय देशमुख यांनी विविध विषयावर विधानसभेत प्रश्न मांडले. उदा. पशुहत्या विरोधी बिल, रोजगार हमी कार्यक्रमात सुधारणा, सिलींग कायदा, दलितांवरील अत्याचार इ. विविध विषयावर अभ्यासपूर्ण प्रश्न विचारून रिपब्लिकन पक्षाच्या वतीने महाराष्ट्र विधानसभेत एकाकी लढत दिली.

३) मध्यवर्ती शासनाने ३० ऑक्टोबर, १९७१ ला बौध्दधर्म स्विकारलेल्या अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती देण्यात येतील असे जाहीर केले व राज्यसरकारांना यासंबंधी आदेशही दिले. नवदीक्षितांना "शेड्यूल्ड कास्ट कन्वर्टस् टु बुध्दिझम" असे नाव देण्यात आले. यामुळे बौध्द विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलतींचा फायदा घेणे सुलभ झाले. [४४]

बौध्द धर्म स्विकारलेल्या विद्यार्थ्याला शैक्षणिक सवलती व सुविधांच्या बाबतीत वंचित व्हावे लागत होते. रिपब्लिकन पक्षाने विविध ठरावामध्ये निवेदनाच्यामध्ये विद्यार्थ्यांना (नवबौध्द) शैक्षणिक सवलती मिळाव्यात म्हणून प्रश्न उचलून धरला होता. त्यामुळे अखेर या प्रश्नाची दखल शासनाने घेऊन हा प्रश्न निकालात काढला.

या कालखंडामध्ये रिपब्लिकन पार्टी (कांबळे गट) यांनाही पुढील कार्ये केलेली दिसतात -

इलस्ट्रेटेड विक्लीचा धिक्कार -

१) "भारतीय रिपब्लिकन पक्ष व बुध्दसासन सभा यांच्या वतीने दि. २२.४.१९७२ रोजी धिक्कार करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बुध्द धर्म स्विकारला होता. त्यास १५ ते १६ वर्ष झाली होती व या साप्ताहिकाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना हरिजन व महार असे संबोधून यांचा अपमान केला होता. त्याच्या रिपब्लिकन पक्षाने २२.४.१९७२ रोजी या साप्ताहिकाच्या कचेरीवर मोर्चा काढून या साप्ताहिकाच्या प्रती जाळल्या. [४५]

२) ब्राम्हण गावी अत्याचार मोर्चा - १२.६.७२ रोजी महाराष्ट्राच्या विधानसभेवर ब्राम्हणगावी बावडे व अन्य ठिकाणी बौध्द रयत लोकांवर जो अत्याचार होतो त्याच्या निषेधार्थ मोर्चा काढला होता. त्यात मुंबईचे उपाध्यक्ष भाऊसाहेब पवार व मा. बी.सी. कांबळे यांनी नेतृत्व केले होते.

३) भुसावळ, ठाणे, मनमाड आदि नगरपालिकांच्या निवडणूकीत रिपब्लिकन पक्षालाचांगले यश मिळाले.

नगरपालिका निवडणूकीत रिपब्लिकन पक्षाला मिळालेल्या जागा -

१. भुसावळ नगरपालिका - ६
२. नाशिक रोड देवळाली नगरपालिका - ६
३. मनमाड नगरपालिका - ४
४. ठाणे नगरपालिका - १
५. नांदगाव नगरपालिका - १
६. अंबरनाथ नगरपालिका - १
७. कराड नगरपालिका - १

असे विविध प्रकारचे यश निवडणूकीत रिपब्लिकन पक्षाला मिळालेले दिसते.

४) दि. २८.२.७४ रोजी मुंबई भीम चौपाटी जवळ पंतप्रधान इंदिरा गांधीच्या विरुद्ध प्रचंड निदर्शने करुन सादर करण्यात आलेले, बौध्दाच्या हक्काबाबतचे ऐतिहासिक निवेदन -

मा. श्रीमती इंदिराजी गांधी
मा. पंतप्रधान भारत सरकार
नवी दिल्ली (सध्या मुंबई) यांना

१. भारतीय रिपब्लिकन पक्षाचे हजारो स्त्री-पुरुष, कामगार विद्यार्थी हे ऐतिहासिक मिरवणूकीने लांब पल्ल्याचे अंतर कापून तुमच्या विरुद्ध निदर्शने करण्यासाठी आले असून सदर निवेदन आपल्याला सादर करण्याचे अधिकार निदर्शक - जनतेने सदर निवेदनावर सह्या करणा-या खालील प्रतिनिधींनी दिलेले आहेत व त्याप्रमाणे सदर निवेदन आपल्याला सादर करण्यात येत आहे. सदर निवेदनाचा विचार आपण भारताचे पंतप्रधान या अधिकारात करावा. त्याचप्रमाणे सदर निवेदनावरील आपल्या भारत सरकारचा निर्णय जितक्या तातडीने शक्य आहे, तितक्या तातडीने करावा व त्याची अंमलबजावणी करावी अशी विनंती आम्ही करत आहोत.

२. हे निदर्शक संख्येने लाखावर आहेत. परंतु त्यांची मागणी फक्त एकच आहे. भारत सरकारच्या नोक-यात त्याचप्रमाणे सर्व घटक राज्यांच्या नोक-यात बौध्द लोकांचे हक्क मान्य करण्यात यावेत आणि त्याप्रमाणे कायदेशीर स्वरुपात तरतूद करण्यात यावी. अशी आमची एकुलती एकच मागणी आहे. असे हक्क यापूर्वीच या लोकांना मान्य करण्यात आले होते. मात्र त्यावेळी ते अस्पृश्य समाजाचे ठरवले जात होते. यापूर्वी मान्य केलेल्या हक्कात खालील हक्काचा समावेश होतो.

अ) मंत्रिमंडळातील प्रतिनिधित्वाचा हक्क

ब) कायदेमंडळातील प्रतिनिधीत्वाचा हक्क

क) सरकारी नोकऱ्यातील हक्क

ड) या लोकांच्या कल्याणाचा व उध्दाराचा हक्क

आम्ही कायदेमंडळातील, प्रतिनिधीत्वाचा हक्क म्हणजे पार्लमेंट विधानसभा यातील राखीव जागांचा हक्क स्वखुशीने सोडून दिला आहे.

सरकारी नोकऱ्यातील हक्काबद्दल बोलावयाचे झाल्यास आम्ही हे सर्व पक्षाने मान्य केले होते की, निरनिराळ्या समाजाचा सरकारी नोकरीत हक्क मिळावेत ही स्वातंत्र्यपूर्वीची स्थिती होती. त्या तत्वाप्रमाणे देखील बौध्द समाज या नात्याने सरकारी नोकऱ्यात बौध्दांना हक्क मिळालेच पाहिजेत हे कोणास नाकारता येणार नाही.

३. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर घटना समितीने वरील तत्व मान्य केले. या तत्वानुसार राज्यघटनेच्या सोळाव्या भागात काही समाजाकरता राखीव नोकऱ्यांचे हक्क नमूद करण्यात आलेले आहेत.

४. १९५६ मध्ये या लोकांनी बौध्द धर्माचा स्वीकार केला. त्याच कारणी १९५६ पासून बौध्द लोकांना हे हक्क नाकारण्यात आले आहेत. हा काळ मोठा प्रदीर्घ १८ वर्षाचा आहे. जगातील कोणत्याही देशात असे उदाहरण सापडेल अशी बिलकुल शक्यताच नाही. सर्व जगावेगळा अन्याय भारत सरकारने चालविला आहे. याचा एकूण परिणाम असा झाला आहे की, गेली १८ वर्षे केंद्र सरकारच्या नोकरीत बौध्दांची कसलीच भरती झाली नसून, केंद्र सरकारच्या कचेऱ्यांचे सर्व दरवाजे बौध्द लोकांना बंद करण्यात आले

आहेत. त्यांच्याकरिता एखादी खिडकी देखील उघडी ठेवण्यात आली नाही. केंद्र सरकारने बौध्दांना नोकरीप्रमाणे आर्थिक व शैक्षणिक सवलतीही नाकारलेल्या होत्या. आता अलिकडे कोठे एक दोन वर्षापूर्वी केवळ शैक्षणिक सवलती केंद्र सरकारने बौध्दांना दिल्या आहेत. ही एक दोन वर्षे सोडल्यास बौध्दांची नुसती ससेहोलपट शैक्षणिक व आर्थिक क्षेत्रात १६ वर्षे चालू होती ही दुःखाची गोष्ट होय.

५. अस्पृश्य लोकांना खास हक्क देण्यासाठी कोणती कसोटी लावण्यात आली होती याची माहिती आपल्यास पंतप्रधान या नात्याने असेलच असे आम्हास वाटते. भारताची अत्युच्च अधिकारी संस्था म्हणजे भारतीय घटना समिती. अस्पृश्य समाजास खास हक्क मंजूर करण्यासाठी घटना समितीने दोन मुख्य कसोट्या लावल्या होत्या. पहिली कसोटी शैक्षणिक अवस्थेची व जीवनमानाबाबतची असून दुसरी कसोटी सामाजिक दुर्बलतेबाबतची आहे. शैक्षणिक दर्जा व जीवनमान भारतीय पातळी ही देखील कमी दर्जाची व सामाजिक दुर्बलता गंभीर स्वरूपाची असल्यामुळे घटना समितीने हे खास हक्क मंजूर केले होते. बौध्द लोकांचे जीवनमान अजून कमी दर्जाचे आहे. त्यामुळे १९५६ पासून सदर लोकांचे खास हक्क काढून घेण्यात कसलेच समर्थनीय कारण नव्हते हे उघड आहे. बौध्द लोक पुढे आणि हे खास हक्क त्यांच्यामागे त्याप्रमाणे ते हक्क या लोकांना मिळाले पाहिजेत. भारतीय राज्यघटनेच्या चौदाव्या कलमाप्रमाणे धार्मिक पक्षपातावरच घटनेनेच मनाई करण्यात आली आहे. केवळ धार्मिक बाबतीत भारत सरकारला हा पक्षपात करता येणार नाही. हा पक्षपात घटनाबाह्य आहे. इंदिराजी आपल्या भारत सरकारने बौध्दांचे खास हक्क १८ वर्षे नाकारून शुध्द धार्मिक जुलूम चालविला आहे.

६. बौध्द लोकांनी धर्मांतर केल्यानंतर काही वर्षांनी महाराष्ट्र सरकारने बौध्दांना शैक्षणिक सवलती प्रथम मंजूर केल्या. त्यानंतर आता सरकारी

नोकरीतील सवलतीसह इतर सवलती मंजूर केलेल्या आहेत. आपल्या भारत सरकारने एक दोन वर्षापूर्वीच केवळ शैक्षणिक सवलती मंजूर केल्या आहेत. परंतु भारत सरकारने केंद्र सरकारच्या नोकरीतील बौध्दांचे हक्क नाकारले आहेत.

७. सर्व साधारणरित्या पाहिल्यास हेच सिध्द होईल की, केंद्रसरकारच्या नोकरीचे दरवाजे बौध्द लोकांना संपूर्णपणे बंद करण्यात आले आहेत. ही गोष्ट लक्षात ठेवण्यासाठी आहे. कारण केंद्र सरकारच्या नोकऱ्यात राखीव जागा ठेवल्या नसल्याने गेली १८ वर्षे त्यांना सर्वसाधारण भरतीत सुध्दा प्रवेशच दिला नाही. यावरुन भारत सरकारचा नोकऱ्याबाबतचा कारभार किती पक्षपाती आहे यावर झगझगीत,प्रकाश पडतो. लोक केवळ बौध्द आहेत म्हणूनच केंद्रसरकारच्या नोकऱ्यांचे दरवाजे बंद करण्यात आले आहेत. या घटने-मुळे भारताच्या प्रतिमेचे तुकडे होतात.

८. आमच्या मागणीच्या पुष्ठ्यर्थ आणखी एक बलवत्तर कारण, आम्ही नमूद करु इच्छितो, हे कारण भारतीय राज्यघटनेच्या मुलभूत हक्कांच्या तिसऱ्या भागातील १६ व्या कलमात आपल्यास आढळून येईल. सदर कलमात अशी तरतूद करण्यात आली आहे की, जर मागासवर्गीय नागरिकांना सरकारी नोकरीत पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले नसेल तर, त्यांना नोकऱ्यांत तसे पुरेसे प्रतिनिधित्व मिळावे म्हणून संघराज्याने तशी तरतूद करावयास हरकत नाही. बौध्द लोकांना केंद्र सरकारच्या नोकऱ्यात पुरे अगर अपुरे प्रतिनिधित्व कोठे आहे ? बौध्दांना सरकारी नोकरीतील प्रतिनिधित्व नाकारण्यात आले आहे.

९. बौध्दांच्या हक्काचा प्रश्न गेली १८ वर्षे कुजत पडलेला आहे. त्यामुळे बौध्द लोकात फार मोठा असंतोष धुमसत आहे. म्हणून इंदिराजी, तुमच्यापुढे

ही विराट निदर्शने करण्यावाचून बौध्द लोकांना कसलेच गत्यंतर नाही. भारत राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने त्याचप्रमाणे बौध्द लोकांच्या कल्याणाच्या दृष्टीने हा प्रश्न समाधानकारकरित्या तातडीने सुटणे आवश्यक आहे.

म्हणून आम्ही आपणास विनंती करतो की, त्याप्रमाणे आपल्यास आवाहन करतो, पंतप्रधान या नात्याने आपण शक्य तितक्या लवकर याबाबतीत योग्य व न्याय्य असा निर्णय घ्यावा.

आपले नम्र -

| | | |
|---|---|---|
| १. वाय.बी.आंबेडकर | २. ए.जी. पवार | ३. के.बी. तळवटकर |
| ४. जी.के. माने | ५. सुमंत गायकवाड | ६. ए.के. गायकवाड |
| ७. डी.पी. कांबळे | ८. आर.जी. रुके | ९. बी.सी.कांबळे ४८ |

वरीलप्रमाणे बौध्द धर्मीयांची कैफियत मोर्चाद्वारे पंतप्रधान इंदिरा गांधी यांना देण्यात आली होती व त्यावर इंदिरा गांधी यांनी चर्चा करण्याचे आश्वासन दिले होते.

अशी विविध प्रकारची कार्ये या कालखंडात करण्यात आली होती.

## १९७५ ते १९७९ चा कालखंड -

या कालखंडात भारतीय राजकारणात दोन महत्त्वाच्या घटना घडल्या.

१. देशांतर्गत आणिबाणी - श्रीमती इंदिरा गांधींच्या सरकारने १२ जून १९७५ मध्ये आंतर्गत अशांततेच्या नावाखाली संपूर्ण देशावर आणिबाणी लागू केली होती.

२. जनता पक्षाचा उदय - या कालखंडात जनता पक्षाचा उदय होऊन प्रथमच केंद्रीय राजकारणांमध्ये हा पक्ष सत्तेवर आला होता. आजपर्यंतची कॉंग्रेसची सत्ता संपुष्टात आली होती. या काळात रिपब्लिकन पक्षाने थोडी फार कार्ये केलेली दिसतात.

अ) निवडणूकीतील कामगिरी - १९७७ च्या सार्वत्रिक निवडणूकीत गायकवाड गटाने कॉंग्रेस पक्षाशी युती केली तर बी.सी. कांबळे यांनी जनता पक्षातूनच निवडणूक लढवून विजयी झाले. बॅ. खोब्रागडे यांनी आपल्या गटातून २ उमेदवार लोकसभेत जनता पक्षाबरोबर युती करुन निवडून आणले. (१) बालाघाट मतदार संघातून कचरूलाल जैन, (२) बुलढाणा मतदार संघातून डी.सी. गवई असे दोन उमेदवार विजयी केले. या निवडणूकीत लोकसभेच्या ५४४ जागापैकी २९३ जागा कॉंग्रेसला प्राप्त झाल्या तर विरोधी पक्ष व इतर अपक्षांना मिळून २४४ जागा प्राप्त झाल्या होत्या. तर रिपब्लिकन पक्षात इतर मागच्या निवडणुकीच्या तुलनेने एकच जागा मिळाली. तर १९७८ च्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणूकीत रिपब्लिकन पक्षातर्फे ७ उमेदवार विजयी झाले. अशा तऱ्हेने लोकसभेत रिपब्लिकन पक्षाचे ३ सभासद व महाराष्ट्र विधानसभेत ७ सभासद या पक्षातर्फे निवडले गेले होते. परंतु मागील निवडणूकीतील कामगिरी पाहाता राज्य विधानसभांच्या मध्ये देशातील इतर घटक राज्यातून फक्त १ (आंध्रप्रदेश) उमेदवार विजयी झालेला होता. त्यामुळे या पक्षाची अवस्था खालावत होती.

या पक्षाने निवडणुकीव्यतिरिक्त कांही कार्ये केली आहेत.

अ) "मध्यवर्ती शासनाने १९७६ मध्ये अनटचॅबिलीटी (ऑफेन्स) ॲक्ट १९५५ रद्द करून त्याजागी सुधारित असा प्रोटेक्शन ऑफ सिव्हील राईटस् ॲक्ट १९७६ मंजूर केला. नवीन कायद्यानुसार अस्पृश्यता पाळणे हा एक दखलपात्र गुन्हा झालेला आहे. हा सुधारित कायदा करण्यासाठी मध्यवर्ती शासनाचे मन परिवर्तन करण्याचे काम श्री गवई रा.सु. यांनी केल्याचे समजते. [४९]

असा सुधारीत कायदा केल्यामुळे अस्पृश्यता पालनाच्या विरूद्द कडक बंधने पडली आहेत.

ब) ऑक्टोबर १९७८ मध्ये रिपब्लिकन पक्ष गवई गटाचे महाराष्ट्र स्तरावरील अधिवेशन भरले. या अधिवेशनात मराठवाडा विद्यापीठाचे नाव बदलून त्यास "डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ" असे नांव द्यावे असा ठराव सर्व संमतीने संमत करण्यात आला. विद्यापीठ नामांतराविषयी मागणी अतिशय लोकप्रिय झालेली होती. त्यास गवई गटाने उचलून धरले होते.

या पक्षाने हा ठराव करण्याअगोदर महाराष्ट्राच्या कायदेमंडळाच्या दोन्ही सभागृहात असा प्रस्ताव मंजूर झाला होता.

३. भारतीय रिपब्लिकन पक्ष खोब्रागडे गटाच्या माध्यमाने नागपूर येथे ५ डिसेंबर, १९७८ रोजी मोर्चा आयोजित केला होता. या मोर्चाने मुख्यमंत्री शरद पवार यांना आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले होते. या मोर्चाच्या अग्रभागी पक्षाध्यक्ष व खासदार खोब्रागडे यांच्यासह पक्षाचे अन्य नेते व कार्यकर्ते होते. त्यात शंकरराव खंडारे, विदर्भ प्रदेश रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष, हरिश्चंद्र रामटेके (मध्यप्रदेश

रिपब्लिकन पक्ष), ॲड. महमद इक्बाल अहमद (नागपूर), ॲड. रामचंद्र धेबे (मुंबई) इत्यादि नेते, कार्यकर्ते सहभागी झाले होते. [५१]

या मोर्चाने मराठवाड्याचे झालेले नामांतर बदलू नये व त्वरीत मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर करण्यात यावे म्हणून मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले होते.

४. दलितांवरील अन्याय अत्याचाराविरुध्द कोणतीही उपाययोजना करण्यासाठी येथील शासन अपयशी ठरलेले आहे. त्यामुळे दलितांचा प्रश्न बिकट होत चाललेला आहे. त्यातून दलितांना मुक्ती मिळवून द्यावयाची असेल तर, "त्यांना सवलती नकोत, त्यांना स्वतंत्र राष्ट्र द्या." अशा आशयाचे विधान रिपब्लिकन पक्षाचे खासदार श्री दौलतराव गवई यांनी लोकसभेत दि. २८ मे, १९७९ रोजी काढले. [५२] श्री डी.जी. गवई हे अनुसुचित जाती जमातीच्या कमिशनरांच्या अहवालावरील चर्चेस बोलत असतांना त्यांनी हे उद्गार काढले होते.

वरील प्रकारची थोडीफार भूमिका रिपब्लिकन पक्षाने या कालखंडात बजावलेली दिसते.

१९८० ते १९८४ चा कालखंड :

या कालखंडात "भारतीय दलित पँथर" सर्व आघाडीवर कार्य करत होता. त्यामुळे या पक्षाला या कालखंडात फारसे महत्व उरलेले नव्हते. या कालखंडात रिपब्लिकन पक्षाने फारच थोडी कार्ये केलेली दिसतात.

१. निवडणुकीतील कामगिरी - १९७९ च्या सातव्या लोकसभेत एकही खासदार म्हणून निवडून आलेला नव्हता. आठव्या लोकसभेच्या निवडणुकीत सुध्दा

एकही खासदार म्हणून निवडून आला नाही. १९८३-८४ च्या दरम्यान महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीत रिपब्लिकन (खोब्रागडे गट) एकमेव उमेदवार ॲड. सुर्यकांत डोंगरे विजयी झाले होते. तर मध्यप्रदेशातून विधानसभेत याच गटातून डोमनसिंग नागपूरे हे एकमेव आमदार विजयी झाले. एकंदर निवडणूकीतील कामगिरी पाहता अत्यंत निराशाजनक स्थिती रिपब्लिकन पक्षाची झालेली दिसते.

रिपब्लिकन पक्षापेक्षा भारतीय दलित पँथरने या कालखंडात महत्वाची कामगिरी बजावली आहे.

२. १९८२ साली कोल्हापूर जिल्ह्यातील माणगांव येथे ६१ वा स्मृती महोत्सव साजरा झाला. (२० मार्च व २१ मार्च, १९८२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सार्वजनिक कार्याला सुरवात करुन या ठिकाणी ६१ वर्षे पूर्ण झाली होती. या निमित्ताने माणगाव येथे ही परिषद आयोजित केली होती. त्यावेळी या महोत्सवाला रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष रा.सु. गवई यांनी मार्गदर्शन केले होते. [५३]

अशी थोडीफार कार्ये या कालखंडात रिपब्लिकन पक्षाने केलेली दिसतात.

<u>१९८५ ते १९८९ चा कालखंड :</u>

या कालखंडात रिपब्लिकन पक्षाची ताकद फारच कमी झाली होती. याकालावधीत प्रकाश आंबेडकर यांचा वेगळा रिपब्लिकन पक्ष निर्माण होऊन तो राजकारणात सहभागी झाला होता. या कालावधीतील पक्षाची कामगिरी खालील प्रमाणे -

१. निवडणुकीतील कामगिरी - १९८९ च्या लोकसभेच्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचाएकही उमेदवार निवडून आला नाही. महाराष्ट्राच्या ९ व्याविधानसभेच्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षातून एकही उमेदवार निवडला गेला नाही. फक्त रा.सु. गवई हे काँग्रेस पक्षाच्या सहकार्याने विधान परिषदेवर निवडून गेले होते. ही एकच कामगिरी रिपब्लिकन पक्षाची होती.

२. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या रिपब्लिकन पक्षाने शासनाने साखर कारखाने ताब्यात घेतले पाहिजेत. या मागणीवरून माणगांव जि. कोल्हापूर ते पुण्यापर्यंत लाँग मार्च (पायी मोर्चा) आयोजित केला होता. [५४] दि. १६ नोव्हेंबर ते २६ नोव्हेंबर १९८५ या कालखंडात निघालेल्या लाँगमार्चचे रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्त्यांनी फार मोठया प्रमाणावर स्वागत केले होते.

३. दि. ५ व ६ मे रोजी प्रकाश आंबेडकर प्रणित रिपब्लिकन पक्षाचे अधिवेशन पुण्याच्या ऐतिहासिक अहिल्या आश्रमाच्या मैदानावर भरले होते. त्याचे अध्यक्ष स्वत: प्रकाश आंबेडकर होते. या अधिवेशनात त्यांनी पक्षाच्या पुनर्बांधणीवर विचार व्यक्त केले होते. [५५]

४. भारतीय रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन २८.१०.८८ ला औरंगाबाद येथे घेण्यात आले होते. या अधिवेशनात निरनिराळे ठराव करण्यात आले. या अधिवेशनात प्रकाश आंबेडकर म्हणाले की, "भारताला स्वातंत्र्य मिळून ४० वर्षे लोटली उद्योग आणि जमीन हे मूळ धरून त्या देशाच्या नियोजन व विकासाच्या आराखडा आणण्यात आला "कसेल त्याची जमीन" हे धोरण स्विकारण्यात आले. परंतु नसेल त्याचे काय या प्रश्नाचे उत्तर अद्यापही कोणाही देऊ शकलेले नाही." असे उद्गार

प्रकाश आंबेडकर यांनी काढले होते. [५६] या अधिवेशनात हजारो लोक व कार्यकर्ते उपस्थित होते.

५. २३ नोव्हेंबर १९८७ रोजी मुंबईत रिडल्स प्रश्नावर मोर्चा आयोजित करण्यात आला होता. या मोर्चात प्रकाश आंबेडकर सहभागी झाले होते. याप्रसंगी सर्व दलित नेते आपले मतभेद विसरून एकत्र आले होते. त्यावेळी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी माघार घेऊन सरकारी निर्णयावर फेर विचार करण्याचे जाहीर केले. [५७]

डॉ. आंबेडकरांच्या ग्रंथातील काही मजकूर शासनाने काढला होता. त्यासंदर्भात सर्व दलितांनी एकत्र येऊन सरकारचा निर्णय बदलावयास लावला होता.

अशी विविध प्रकारची कार्ये या पक्षाने केली होती.

## १९९० ते १९९४ चा कालखंड :

सध्याच्या कालखंडात रिपब्लिकन पक्षाचे अनेक गट तयार झाले आहेत. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट), भारतीय रिपब्लिकन पक्ष (आंबेडकर गट), अखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष (गवई गट), रिपब्लिकन पक्ष (कांबळे गट), रिपब्लिकन पक्ष (खोब्रागडे) असे अनेक गट आता महाराष्ट्रात कार्य करत आहेत.

१. निवडणूकीतील कामगिरी – लोकसभेत कोणत्याही गटाचा एकही प्रतिनिधी नाही, राज्यसभेत फक्त प्रकाश आंबेडकर यांची निवड झाली होती. तर महाराष्ट्राच्या विधानसभेत फक्त एकच उमेदवार उपेंद्र शेन्डे हे खोब्रागडे गटातून विजयी झाले. तर कॉंग्रेस पक्षाच्या सहकार्याने रा.सु. गवई, आमदार टी.एम्. कांबळे व रामदास आठवले हे विधान परिषदेचे सदस्य

आहेत. आठवले गटाने कॉंग्रेस पक्षाबरोबर युती केल्यामुळे रामदास आठवले यांना महाराष्ट्राच्या समाजकल्याण मंत्रिपदावर घेतले आहे.

या विविध रिपब्लिकन नेत्यांनी अनेक प्रश्न महाराष्ट्राच्या विधीमंडळात उपस्थित करुन ते सोडविले आहेत. विधी मंडळातील आपल्या कामगिरीबाबत बोलतांना विद्यमान आमदार उपेंद्र शेन्डे म्हणाले होते की, "रिपब्लिकन पक्षाचा मीएकटा आमदार असल्यामुळे विधानसभेत माझी फार कोंडी होते. तेथे प्रश्नोत्तरात, चर्चेत मला फारसा वेळ दिला जात नाही. तेथे जो उरलेला अल्पसा वेळ दिला जातो. त्यात आपली भूमिका मांडणे अतिशय कठीण काम असते. तरीही मी तेथे जनतेचे प्रश्न मांडण्याचा प्रयत्न करतो." ५८ तरी सुध्दा रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमाने नेत्यांनी पुढील कार्ये केली आहेत.

१. आमदार टी.एम्. कांबळे यांनी आपल्या प्रयत्नाने पुढील कार्ये केली.

अ. दलित, भटके आदिवासी विद्यार्थी यांचेसाठी असलेल्या आश्रम शाळा-तील अनुदान १२० रुपयावरुन २२० रुपये झाले.

ब. महाराष्ट्रात कॉंग्रेस पक्षाने मंडल आयोग मान्य केला याचे श्रेय रिप-ब्लिकन पक्षाने घेतलेल्या आग्रही भूमिकेला आहे.

क. गायरान, पडिक, महार वतनाच्या जमिनीबाबत १४ एप्रिल,१९९० पर्यंत मुदत वाढवली होती.

इत्यादी लहान मोठी कार्ये रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमाने होत होती. प्रकाश आंबेडकरांनी या काळात उत्तर भारतीयांचा मेळावा घेऊन त्यात मार्गदर्शन केले होते. याशिवाय रिपब्लिकन पक्षाच्या सर्व गटानी नामांतराच्या चळवळीत भाग घेतला होता. त्यांच्या व सर्व दलितांच्या प्रयत्नाने १४ जानेवारी, १९९४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली आहे.

अशी विविध प्रकारची कार्ये या पक्षाने केली होती.

समारोप :

३ आक्टोबर, १९५७ रोजी अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाली. पक्ष स्थापने नंतर फक्त दोन वर्षांच्या कालखंडात हा पक्ष एकसंघ होता. परंतु दोन वर्षांनंतर दुरुस्त व नादुरुस्त असे पक्षात दोन गट निर्माण झाले. या दोन गटांना एकत्र आणण्यासाठी प्रयत्न झाले. परंतु ते यशस्वी झाले नाहीत. रिपब्लिकन पक्ष एकसंघ असताना सुरवातीच्या काळात या पक्षाने चांगल्या प्रकारे कार्य केले. विशेषत: या काळातील भूमिहीनाना सत्याग्रह व्यापक प्रमाणात यशस्वी झाला. परंतु पक्ष फुटीनंतर या पक्षाचे सामर्थ्य कमी झाले. त्यानंतरच्या काळात पक्षात अनेक गट नेत्यांच्या नावे तयार झाले. उदा. कांबळे गट, भंडारे गट, गायकवाड गट, खोब्रागडे गट, शांताबाई दाणी गट, रा.सु. गवई गट, आठवले गट असे गट तयार झाल्याने त्यांची शक्ती कमी झाली. परिणामी हा पक्ष स्वत:चे अस्तित्वच गमावून बसला.

रिपब्लिकन पक्षाच्या पहिल्या पिढीत एन्. शिवराज, बी.सी.कांबळे, दादासाहेब गायकवाड, राजाभाऊ खोब्रागडे इत्यादी मातब्बर नेते होते. त्यामुळे कांही काळ या पक्षाने चांगले कार्य केले. परंतु रिपब्लिकन पक्षाच्या दुसऱ्या अवस्थेत रा.सु. गवई, प्रकाश आंबेडकर, रामदास आठवले इत्यादी नेते पक्ष पुढे नेण्याचा प्रयत्न करत आहेत. यांच्या पक्षात देखील एकीचे प्रयत्न झाले होते, परंतु ते ऐक्य फार काळ टिकले नाही. सार्वत्रिक निवडणूकीत कोणत्या पक्षाला सहकार्य करायचे या कारणावरुन पक्षात एकी होत नाही.

देशातील व महाराष्ट्रातील कॉंग्रेस व इतर प्रमुख पक्षांच्या प्रभावामुळे रिपब्लिकन पक्ष स्वतंत्रपणे निवडणूकीत यशस्वी होत नाही. त्यामुळे हा पक्ष इतर पक्षांच्या सहकार्याने उभा आहे.

मध्यंतरीच्या काळात रिपब्लिकन पक्षाच्या नेत्यांना कंटाळून दलित तरुणांनी "दलित पँथर" ही राजकारण विरहित संघटना निर्माण केली होती. परंतु त्यास सुध्दा नेतृत्व संघर्ष, वैचारिक संघर्ष निर्माण झाल्यामुळे ही संघटना फुटली व त्याचे सामर्थ्य कमी झाले.

थोडक्यात रिपब्लिकन पक्षाची निर्मिती झाल्यानंतर त्यात अनेक गट निर्माण झाले व त्याचे अस्तित्व कमी झाले. परिणामी डॉ. आंबेडकर यांना अभिप्रेत असलेला "रिपब्लिकन पक्ष" निर्माण होऊ शकला नाही.

........

प्रकरण तिसरे

## संदर्भ यादी


१. एल्.जी. मेश्राम, भारतीय रिपब्लिकन पक्ष, संपादक शरणकुमार लिंबाळे, प्रचार प्रकाशन, नंदिनी गल्ली, कोल्हापूर १९९२, पृ.क्र.५९.

२. प्रकाश जंजाळ, आंबेडकर क्रांतीसेनानी, एन्.शिवराज, प्रचार प्रकाशन, नंदिनी गल्ली, कोल्हापूर, १९९२, पृ.क्र. ७३.

३. प्रकाश जंजाळ, आंबेडकर क्रांतिसेनानी, एन्.शिवराज, प्रचार प्रकाशन, नंदिनी गल्ली, कोल्हापूर, १९९२, पृ.क्र. ७४.

४. प्रकाश जंजाळ, आंबेडकर क्रांतीसेनानी, एन्. शिवराज, प्रचार प्रकाशन, नंदिनी गल्ली, कोल्हापूर, १९९२, पृ.क्र. ८२.

५. प्रबुद्ध भारत (दैनिक) संपा. मुकुंदराव आंबेडकर, बुद्धभूषण प्रिंटींग प्रेस, मुंबई, २८.१२.१९५७, पृ.क्र. २.

६. प्रबुद्ध भारत.

७. आर.के. क्षिरसागर, भारतीय रिपब्लिकन पक्ष, नाथ प्रकाशन, (पी.एस. चिकल्लठाणकर) औरंगाबाद, १९७९, पृ.क्र.५९.

८. आर.के. क्षिरसागर, भारतीय रिपब्लिकन पक्ष, नाथ प्रकाशन, (पी.एस. चिकल्लठाणकर) औरंगाबाद, १९७९, पृ.क्र. ६०.

९. आर.के. क्षिरसागर, भारतीय रिपब्लिकन पक्ष, नाथ प्रकाशन, (पी.एस. चिक्लठाणकर) औरंगाबाद, १९७९, पृ.क्र. ६०.

१०. आर.के. क्षिरसागर, भारतीय रिपब्लिकन पक्ष, नाथ प्रकाशन, (पी.एस. चिक्लठाणकर) औरंगाबाद, १९७९, पृ.क्र. ६१.

११. आर.के. क्षिरसागर, भारतीय रिपब्लिकन पक्ष, नाथ प्रकाशन, (पी.एस. चिक्लठाणकर) औरंगाबाद, १९७९, पृ.क्र. ६४.

१२. आर.के. क्षिरसागर, भारतीय रिपब्लिकन पक्ष, नाथ प्रकाशन, (पी.एस. चिक्लठाणकर) औरंगाबाद, १९७९, पृ.क्र. ६४.

१३. प्रक्षुब्ध भारत, (साप्ता.) कार्य. संपा. शंकरराव खरात, संपा. प्रक्षुब्ध भारत, १०.१०.५९, पृ.क्र. २.

१४. आर.के. क्षिरसागर, भारतीय रिपब्लिकन पक्ष, नाथ प्रकाशन, (पी.एस. चिक्लठाणकर) औरंगाबाद, १९७९, पृ.क्र. ६५.

१५. भारतीय रिपब्लिकन पक्ष, संपादक शरणकुमार लिंबाळे, प्रचार प्रकाशन, नंदिनी गळी, कोल्हापूर, १९९२, पृ.क्र. २७४.

१६. प्रक्षुब्ध भारत (दैनिक) संपा. मुकुंदराव आंबेडकर, बुध्दभवन प्रिंटींग प्रेस, मुंबई, १९.१०.१९५७, पृ.क्र. ३.

१७. भुषण जोरगुळवार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, संपा. टी.ए. गळी व इतर प्रकाशक, प्रचार प्रकाशन, नंदिनी गळी, कोल्हापूर, १९९१, पृ.क्र. ३२४.

१८. प्रा.एम्.डी. नलवडे, माणगाव परिषद खास अंक, संपा. रमेश नवरे, कोल्हापूर, १९८२, पृ.क्र. ७.

१९. प्रक्षुब्ध भारत संपा. मुकुंदराव आंबेडकर, बुध्दभुवन प्रिंटींग प्रेस, मुंबई, ३.१.१९५९, पृ.क्र. २.

२०. प्रकाश जंजाळ, आंबेडकर क्रांती सेनानी, एन्. शिवराज, प्रचार प्रकाशन, नंदिनी गळी, कोल्हापूर, १९९२, पृ.क्र. ८०.

२१. आर.के. क्षिरसागर, भारतीय रिपब्लिकन पक्ष, नाथ प्रकाशन, (पी.एस्. चिक्कलठाणकर) औरंगाबाद, १९७९, पृ.क्र. १०८.

२२. आर.के. क्षिरसागर, भारतीय रिपब्लिकन पक्ष, नाथ प्रकाशन, (पी.एस्. चिक्कलठाणकर) औरंगाबाद, १९७९, पृ.क्र. ९५.

२३. आर.के. क्षिरसागर, भारतीय रिपब्लिकन पक्ष, नाथ प्रकाशन, (पी.एस्. चिक्कलठाणकर) औरंगाबाद, १९७९, पृ.क्र. १०४.

२४. एल्.जी. मेश्राम, भारतीय रिपब्लिकन पक्ष, संपा. शरणकुमार लिंबाळे, प्रसार प्रकाशन, नंदिनी गवळी, कोल्हापूर, १९९२, पृ.क्र. ९१.

२५. भैय्यासाहेब आंबेडकर मुलाखत, भारतीय रिपब्लिकन पक्ष, संपा.शरणकुमार लिंबाळे, प्रचार प्रकाशन, नंदिनी गवळी कोल्हापूर, १९९२, पृ.क्र. २७७.

२६. न.वी. पवार, भारतीय रिपब्लिकन पक्ष, संपा. शरणकुमार लिंबाळे, प्रचार प्रकाशन, नंदिनी गवळी, कोल्हापूर, १९९९, पृ.क्र. १५३.

२७. धम्मलिपी, कासल्यायन जन्म विशेषांक, संपादक राजा ढाले, मुंबई, ५.१.१९९०, पृ.क्र. ४.

२८. साप्ताहिक जनसंदेश, संपादक अनिल बी. अहिरे, नादुर्डी (निफाड) ६.१.१९९०, पृ.क्र. २.

२९. भारतीय रिपब्लिकन पक्ष, संपा. शरणकुमार लिंबाळे, प्रचार प्रकाशन, नंदिनी गवळी, कोल्हापूर, १९९२, पृ.क्र. २२६.

३०. साप्ताहिक "आपल महानगर" संपादक निखील वागळे, मुंबई, ५.१२.१९९१, पृ.क्र. २.

३१. साप्ताहिक "आपल महानगर" संपादक निखील वागळे, मुंबई, ५.१२.१९९१, पृ.क्र. २.

३२. साप्ताहिक आपल महानगर, संपादक निखील वागळे, मुंबई, दि. ५.१२.१९९१, पृ.क्र. ८.

३३. साप्ताहिक "आपल महानगर" संपादक निखील वागळे, मुंबई, ५.१२.१९९१ पृ.क्र. ८.

३४. आर.के. क्षिरसागर, भारतीय रिपब्लिकन पक्ष, नाथ प्रकाशन, (पी.एस. चिक्लठाणकर) औरंगाबाद, १९७९, पृ.क्र. १४८.

३५. प्रकाश जंजाळ, आंबेडकर क्रांतिसेनानी, एन्.शिवराज, प्रचार प्रकाशन, नंदिनी गवळी, कोल्हापूर, १९९२, पृ.क्र. ८८.

३६. प्रबुध्द भारत, संपा. मुकुंद आंबेडकर, बुध्दभूषण प्रिंटींग प्रेस, मुंबई, दि. २.१२.१९६१, पृ.क्र. १.

३७. एम्.ई. भगत. संपादक

३८. संपा. शरणकुमार लिंबाळे, भारतीय रिपब्लिकन पक्ष, प्रचार प्रकाशन, नंदिनी गवळी, कोल्हापूर, १९९२, पृ.क्र. ९८.

३९. साप्ताहिक प्रबुध्द भारत , कार्य. संपादक, मा.र. कद्रेकर, मुंबई, दि. ५.१२.१९६४, पृ.क्र. ७.

४०. साप्ताहिक प्रबुध्द भारत, कार्य. संपादक मा.र. कद्रेकर, मुंबई, दि. ५.१२.१९६४, पृ.क्र. ७.

४१. आर.के. क्षिरसागर, भारतीय रिपब्लिकन पक्ष, नाथ प्रकाशन, (पी.एस. चिक्लठाणकर) औरंगाबाद, १९७९, पृ.क्र. १५९.

४२. संपादक शरणकुमार लिंबाळे, भारतीय रिपब्लिकन पक्ष, प्रचार प्रकाशन नंदिनी गवळी, कोल्हापूर, १९९२, पृ.क्र. २८२.

४३. संपादक शरणकुमार लिंबाळे, भारतीय रिपब्लिकन पक्ष, प्रचार प्रकाशन, नंदिनी गळ्ळी, कोल्हापूर, १९९२, पृ.क्र. २८२.

४४. शासनाचा आदेश - दि. ३० ऑक्टोबर, १९७१.

४५. दैनिक रिपब्लिकन, संपादक बी.सी. कांबळे, नागपूर, दि.१३.२.७८, पृ.क्र. ३.

४६. दैनिक रिपब्लिकन, संपादक बी.सी. कांबळे, नागपूर, दि.१३.२.७८, पृ.क्र. १.

४७. दैनिक रिपब्लिकन, संपादक बी.सी. कांबळे, नागपूर, दि.१३.२.७८, पृ.क्र. ४.

४८. दैनिक रिपब्लिकन, संपादक बी.सी. कांबळे, नागपूर, दि.३.१.१९७५, पृ.क्र. ४.

४९. आर.के. क्षिरसागर, भारतीय रिपब्लिकन पक्ष, नाथ प्रकाशन, (पी.एस. चिक्लठाणकर) औरंगाबाद, १९७९, पृ.क्र. १५४.

५०. आर.के. क्षिरसागर, भारतीय रिपब्लिकन पक्ष, नाथ प्रकाशन, (पी.एस. चिक्लठाणकर) औरंगाबाद, १९७९, पृ.क्र. १५६.

५१. दैनिक प्रजासत्ताक, प्रकाशक ॲड. बी.आर. कांबळे, चंद्रपूर, दि. ११.१२.७८, पृ.क्र. २.

५२. साप्ताहिक जयभिम, संपादक मधुकर काशिनाथ डोंगरे, सितावर्डी, नागपूर, दि. ९.६.१९७९, पृ.क्र. ३.

५३. माणगाव परिषद खास अंक,संपादक रमेश डावरे, कोल्हापूर, १९८२, पृ.क्र. ४.

५४. "कार्यक्रम पत्रिका", निमंत्रक व प्रकाशक प्रकाश आंबेडकर, १५ नोव्हेंबर, १९९५.

५५. प्रक्षुब्ध भारत (दैनिक) संपादक प्रकाश आंबेडकर, राजगृह, मुबई, दि. २८.१०.८८, पृ.क्र. १.

५६. मासिक "युगप्रबोधन", संपादक एस.बी. वाघमारे, नागपूर, ओ.नो.शि., १९८८, पृ.क्र. १.

५७. साप्ताहिक ब्लिट्झ, दि. ५.१२.१९८७.

५८. संपादक शरणकुमार लिंबाळे, भारतीय रिपब्लिकन पक्ष, प्रचार प्रकाशन, नंदिनी गल्ली, कोल्हापूर, १९९२, पृ.क्र. ६९.

........